RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ

उपलब्ध आहे!
मिस्त्री, टाइल्स फिटर, पेंटर, कारपेंटर,
प्लंबर इत्यादीसाठी खालील नंबर वर संपर्क करावा.
संपर्क मो. 8482839451


गुरूवार, २२ मे २०२५ | वर्ष : ५ | अंक : १४४ | दैनिक | किंमत : ₹ ५/-
Thursday, 22 May 2025 | Year : 5 | Issue : 144 | Daily | Rate: Rs. 5/-

# वक्फ हा धर्मादाय प्रकार असून इस्लामचा अविभाज्य घटक नाही : केंद्र

**नवी दिल्ली :** वक्फ दुरुस्ती कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांच्या सुनावणी दरम्यान केंद्र सरकारने बुधवारी सर्वोच्च न्यायालयात सांगितले की, वक्फ हा धर्मादाय प्रकार असून इस्लामचा अविभाज्य भाग नाही. वक्फ बोर्ड केवळ धर्मनिरपेक्ष कार्ये करतात हे अधोरेखित करून, सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी सांगितले की, मंदिरेही केवळ धार्मिक असली तरी त्यांचे प्रशासन मुस्लिम व्यक्तीकडे असू शकते, कारण ती वक्फसारखी नाहीत.

सॉलिसिटर जनरल तुषार मेहता यांनी पुढे सांगितले की, 'वक्फ ही एक इस्लामिक संकल्पना आहे. पण ती इस्लामचा अविभाज्य भाग नाही. वक्फचा इस्लाममध्ये अर्थ फक्त दान असा होतो. यापूर्वीच्या न्यायालयीन निकालांवरून असे दिसून येते की, दान हा प्रत्येक धर्माचा भाग आहे. हिंदू आणि ख्रिश्चन धर्मासह शिखांमध्येही दान करण्याची व्यवस्था आहे.

या प्रकरणात मुस्लिम पक्षाने काल आपले म्हणणे मांडल्यानंतर आज सरकारतर्फे युक्तिवाद करताना सॉलिसिटर जनरल तुषार मेहता म्हणाले की,




'वादग्रस्त 'वक्फ-बाय-युजर' तत्त्वानुसार वक्फ घोषित केलेल्या मालमत्ता पुन्हा मिळवण्याचा केंद्र सरकारला कायदेशीररित्या अधिकार आहे.'

नवीन कायद्यात 'वक्फ-बाय-युजर' ही तरतूद रद्द करण्यात आली आहे, त्यामुळे औपचारिक कागदपत्रांशिवायही, धार्मिक आणि धर्मादाय हेतूंसाठी दीर्घकालीन वापराच्या आधारावर मालमत्तेला वक्फ म्हणून मानले जाऊ शकते.

वक्फ मालमत्तेचे नियमन करण्यासाठी सरकारी देखरेख वाढवणाऱ्या वक्फ कायद्याला आव्हान देणाऱ्या याचिकांवर सर्वोच्च न्यायालय सुनावणी करत असताना मेहता यांनी हा युक्तीवाद केला. 'सरकारी जमिनीवर हक्क सांगण्याचा कोणालाही

> आम्ही 1923 पासून अस्तित्वात असलेल्या धोक्याचे उच्चाटन करत होतो. कायद्यात सुधारणा करताना प्रत्येकाचे म्हणणे ऐकण्यात आले. काही याचिकाकर्ते संपूर्ण मुस्लिम समुदायाचे प्रतिनिधित्व करत असल्याचा दावा करू शकत नाहीत.
>
> – सॉलिसिटर जनरल

अधिकार नाही. सर्वोच्च न्यायालयाचा एक निकाल आहे ज्यामध्ये म्हटले आहे की, जर ती मालमत्ता सरकारची असेल आणि वक्फ म्हणून घोषित केली गेली असेल तर सरकार परत मिळवू शकते,' असेही मेहता यांनी मुख्य न्यायाधीश बी.आर. गवई आणि न्यायाधीश ऑगस्टीन जॉर्ज मसीह यांच्या दोन न्यायाधीशांच्या खंडपीठासमोर सांगितले.

केंद्र सरकारने सर्वोच्च न्यायालयाला असेही सांगितले की, वक्फ कायद्यातील नवीन सुधारणांमुळे अशा समस्या सोडवण्यात आल्या ज्या ब्रिटिश आणि त्यानंतरच्या भारतीय सरकारांना सोडवता आल्या नव्हत्या.

# चिखली 'एमआयडीसी'त अग्नितांडव!

## लाखोंची हानी

**बुलढाणा :** चिखली एमआयडीसी परिसरातील एका लघु उद्योगात लागलेल्या आगीत उत्पादित माल जळून खाक झाल्याने लाखो रुपयांची हानी झाली आहे. काल मंगळवारी, 20 मे रोजी मध्यरात्री नंतर ही आग लागली. अग्निशमन दलानी केलेल्या शर्थीच्या प्रयत्नानंतर ही आग आटोक्यात आली. मात्र तोपर्यंत लाखोंचा माल भस्म झाला होता. चिखली शहरातील नागवाणी यांचे महाराष्ट्र राज्य औद्योगिक वसाहत मध्ये नागवानी इंडस्ट्रीज या नावाची पत्रावळी व द्रोण तयार करणारी कंपनी आहे. काल 21 मार्चच्या मध्यरात्री तिथे अचानक भीषण आग लागल्याचे दिसून आले. सोसाट्याच्या वारा व उत्पादन सहज जळण्यासारखे असल्याने पाहतापाहता आग जोरात भडकली. या आगीत कंपनीतील लाखो रुपयांचे साहित्य पूर्णतः जळून खाक झाले आहे. दरम्यान याची माहिती मिळाल्यावर आधी चिखली नगरपरिषदेचे अग्निशमन दल बोलविण्यात आले. मात्र आग आटोक्यात येण्याची चिन्हे नसल्याने सुमारे 30 किलोमीटर अंतरावरील बुलढाणा येथील नगर पालिकेचे अग्निशमन दल देखील पाचारण करण्यात आले. तोपर्यंत भीषण आगीने संपूर्ण युनिटला विळख्यात घेतले होते. दरम्यान चिखली व बुलढाणा दलाने जोरदार पाण्याचा मारा करून आटोकाट प्रयत्न केले. यामुळे दीर्घ संघर्षा नंतर ही आग आटोक्यात आली. मात्र तोपावेतो द्रोण, पत्रावळी, कच्चा माल, अन्य साहित्य हे जळून त्याची राख रांगोळी झाली होती. आग आटोक्यात आणण्यासाठी पालिका अग्निशमन दलाचे प्रवीण जाधव, राहुल गवळी, पांडुरंग सोळंकी, तुषार गवई, शेख इस्माईल, अनुप खरे, सागर गवळी आणि अन्य जवानांनी अथक प्रयत्न केले.



या जवानांच्या प्रचंड मेहनतीमुळे आग नियंत्रणात आणण्यात यश आले, परंतु तोपर्यंत कंपनीचे मोठे नुकसान झाले होते. या घटनेत 12 ते 15 लाखोंचे साहित्य जळून खाक झाल्याचा प्राथमिक अंदाज आहे. मात्र आज बुधवारी, 21 मे रोजी दुपार पर्यंत आग

# इलॉन मस्क यांच्या 'ट्रम्प प्रेमा'चा टेस्लाच्या विक्रीवर परिणाम



**नवी दिल्ली :** जगातील सर्वात श्रीमंत व्यक्ती म्हणून बहुमान प्राप्त करणाऱ्या एलॉन मस्क यांच्या व्यवसायाला ट्रम्प संबंधाची झळ बसू लागली आहे. मस्क यांची टेस्ला ही कंपनी विजेवर चालणारी वाहने उत्पादित करते. या वाहनांना युरोप आणि अमेरिकेतून मोठी मागणी आहे. मात्र गेल्या काही काळात एलॉन मस्क यांची ट्रम्प यांच्याशी जवळीक वाढली. त्याचा फटका आता टेस्लाच्या वाहनविक्रीला बसला आहे. डेन्मार्कमधील आघाडीची बांधकाम कंपनी त्शेनिंगने आपल्या ताफ्यातील टेस्लाच्या कार कंपनीला परत दिल्या आहेत. टेस्लाच्या वाहनांमध्ये कोणतीही कमरता नाही. पण एलॉन मस्क यांच्यामुळे वाहने परत करत आहोत, असे त्शेनिंगने म्हटले आहे. युरोपमध्ये टेस्लाची लोकप्रियता कमी होत आहे. त्शेनिंगच्या निर्णयामुळे या दाव्याला आणखी बळकटी मिळत आहे. मस्क यांची राजकारणातील सक्रियता वाढल्यानंतर युरोपमध्ये टेस्लाची विक्री कमी झाली असून ब्रँड इमेजला धक्का बसला आहे.

# पाकिस्तानात सिंधू पाणी प्रश्न पेटला



**नवी दिल्ली :** पाकिस्तान सध्या चोहोबाजूंनी अडचणींचा सामना करतो. देशाची आर्थिक स्थिती ढासळली आहे, बलुचिस्तानमध्ये अस्थिर वातावरण निर्माण झाले आहे, सीमेवर भारताबरोबर संघर्ष चालू आहे आणि आता सिंध प्रांतातही तणाव निर्माण झाला आहे. सिंधमधील जनता सिंधू नदीवरील वादग्रस्त सहा कालव्यांच्या प्रकल्पाविरुद्ध रस्त्यावर उतरली आहे. गेल्या काही दिवसांपासून सिंधमधील लोक निदर्शने करत आहेत. मंगळवारी, या आंदोलनाने हिंसक वळणे घेतले. आंदोलकांनी सिंध प्रांताचे गृहमंत्री झियाउल हसन लंजर यांच्या नौशहरो फिरोज जिल्ह्यातील बंगल्यावर हल्ला चढवला आणि आग लावली.आंदोलकांनी राष्ट्रीय महामार्गानजिक मोरो शहरातील मंत्र्याच्या निवासस्थानावर हल्ला केला. तसेच बंगल्याबाहेरच्या रस्त्यावर उभे असलेले दोन ट्रेलर (मोठी मालवाहू वाहने) पेटवले. यावेळी पोलिसांनी आंदोलकांवर लाठीहल्ला केला.

# 11 वी ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेस ब्रेक

**मुंबई :** ऑनलाईन प्रवेश परिक्षा सुरु होणे अपेक्षित होते. मात्र महाराष्ट्रशासनाची वेबसाईट बंद पडली आहे. आज बुधवार (21 मे 2025 ) अकरावीसाठी ऑनलाईन रजिस्ट्रेशन सुरु होणार होते. परंतू सरकारची बेवसाईट अंडर कन्स्ट्रक्शन असल्याचा संदेश या वेबसाईटवर येत आहे त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांना मनःस्तापाला सामोरे जावे लागले आहे. 11 वीच्या प्रवेश प्रक्रियेला बुधवारपासून सुरु होणार होती. आता रजिस्ट्रेशनसाठी प्रक्रिया सुरू होणार होती.मात्र महाराष्ट्र शासनाची अकरावी प्रवेश प्रक्रियेची वेबसाईट हँग झाली आहे. ही लिंक लिंक 28 मे 2025 रोजी सायंकाळी 6 वाजता बंद होईल असे या बेवसाईटवर म्हटले आहे. म्हणजे विद्यार्थ्यांना केवळ एक आठवड्याचा वेळ आहे. अशात पहिल्याच दिवशी सरकारी वेबसाईट ठप्प झाली आहे. आठवडाभरात अर्ज भरण्याचा प्रक्रिया पूर्ण करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. परंतू पहिल्याच दिवशी वेबसाईट हँग झाल्याने राज्य शासनाचे माहिती आणि तंत्रज्ञान विभागाचा कारभार चव्हाट्यावर आला आहे. विद्यार्थी किमान एक आणि जास्तीत जास्त दहा कनिष्ठ महाविद्यालयांसाठी त्यांची पसंती देऊ शकतात. दहावी बोर्डानुसार यंदा महाराष्ट्र एफवायजेसी प्रवेशसाठी एकूण 9,281 कनिष्ठ महाविद्यालयांसाठी आणि कला, वाणिज्य आणि विज्ञान शाखेतील 20 लाखांहून अधिक जागांसाठी अर्ज येणार आहेत. महाराष्ट्राचा यंदाचा निकाल हा तब्बल 94.10 टक्के इतका लागला आहे.




दहावीच्या परीक्षेसाठी राज्यभरातील 9 शिक्षण विभागातून तब्बल 15 लाखांहून अधिक विद्यार्थी बसले होते. यापैकी 14 लाखांहून अधिक विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. यंदा दहावीला मुंबई, पुणे, रत्नागिरी, नाशिक,कोल्हापूर, नागपूर, छत्रपती संभाजी नगर, अमरावती, लातूर या 9 विभागीय मंडळात एकूण 15 लाख 46 हजार 579 विद्यार्थी बसले होते. आणि त्यापैकी 14 लाख 55 हजार 433 विद्यार्थी परीक्षेत उत्तीर्ण झाले आहेत.

# पुढच्या 48 तासांत 14 हजार चिमुकल्यांचा मृत्यू होईल?



**नवी दिल्ली :** 7 ऑक्टोबर 2023 रोजी हमासच्या हल्ल्यांनंतर इस्त्रायलने त्यांच्याविरुद्ध कारवाई सुरू केली. यासाठी त्यांच्याकडे शस्त्रास्त्रांचा एक मोठा साठा होता. यापैकी अनेक शस्त्र अमेरिकेने पुरवले सोबतच इतर शस्त्रांसाठी इस्त्रायलला आर्थिक मदतही केली. इस्त्रायलचे इतर युरोपीय मित्र देशदेखील या संकटाच्या काळात त्यांच्या पाठीशी उभे होते. 7 ऑक्टोबरच्या हल्ल्यात 1200 लोकांचा मृत्यू झाला, यानंतर इस्त्रायलबद्दल सहानुभूती आणि एकजूट निर्माण झाली होती. या हल्ल्यात मृत्यू पावलेल्यांपैकी बहुतांश इस्त्रायली नागरिक होते. याशिवाय 251 लोकांना हमासने बंदी बनवले होते आणि त्यांना गाझामध्ये ओढत नेण्याच्या समोर आलेल्या फोटोंनीही इस्त्रायलबद्दल आंतरराष्ट्रीय सहानुभूती वाढवली होती. अकरा आठवड्यांच्या नाकेबंदीनंतर मदतीच्या गाड्या सीमा ओलांडू लागल्या असल्या तरी, गाझामधील नागरिकांमध्ये अजूनही कोणत्याही मदतीचे वाटप करण्यात आलेले नाही, असे संयुक्त राष्ट्रांनी म्हटले आहे. मंगळवारी 20 मे रोजी मदतीचे साहित्य असलेल्या 93 गाड्यांनी गाझामध्ये प्रवेश केला असं इस्त्रायलमधील अधिकारी सांगत आहेत. त्यात पीठ, लहान मुलांसाठीचे अन्न, वैद्यकीय उपकरणे आणि औषधांचा समावेश आहे. मात्र, संयुक्त राष्ट्रांच्या म्हणण्यानुसार, केरेम शेलोमलगतच्या पॅलेस्टिनी भागात या गाड्या पोहोचल्या असल्या तरी मदतीचं वाटप नागरिकांमध्ये करण्यात आलेले नाही. जागतिक दर्जाच्या तज्ज्ञांनी गाझामध्ये मोठा दुष्काळ पडणार असल्याचा इशारा दिल्यानंतर इस्त्रायलने रविवारी (18 मे) या भागात मुलभूत अन्नसाठा येऊ शकतो अशी परवनागी दिली. इस्त्रायलने मदत येऊ दिली नाही तर गाझामधल्या हजारो लहान बाळांचा मृत्यू होईल असे यापुर्वी संयुक्त राष्ट्राचे मानवतावादी प्रमुख टॉम फ्लेचर बीबीसीशी बोलतान म्हणाले होते. 'आमची मदत त्यांच्यापर्यंत पोहोचली नाही तर पुढच्या 48 तासात 14,000 बाळांचा मृत्यू होईल.' ही आकडेवारी कशी कळाली असे विचारले असता ते म्हणाले त्यांनी जमिनी स्तरावरच्या वैद्यकीय केंद्रांवर आणि शाळांमध्ये काम करणाऱ्या त्यांच्या पथकांकडे बोट दाखवले. मात्र, याबाबत आणखी स्पष्टता त्यांनी दिली नाही. आयपीसीचा जो अहवाल त्यांनी अधोरेखित केला त्यानुसार, 6 ते 59 महिने या वयातील 14,100 मुलांमध्ये एप्रिल 2025 ते मार्च 2026 या काळात तीव्र कुपोषणाचे प्रमाण दिसून येईल असे सांगितले आहे.

# नक्षली चळवळीचा कणा असलेल्या बसवा राजूसह 27 नलक्षवादी ठार

**नवी दिल्ली :** छत्तीसगडमधील नारायणपूरमध्ये 27 नक्षलवाद्यांना ठार करण्यात आले आहे, अशी माहिती केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी दिली आहे. या कारवाईमध्ये सीपीआय-माओवादी पक्षाचा जनरल सेक्रेटरी आणि नक्षली चळवळीचा कणा म्हणून ओळखला जाणारा नंबाला केशव राव उर्फ बसवा राजू यालाही ठार करण्यात आले आहे. छत्तीसगडमधील नारायणपूरमध्ये झालेल्या कारवाईत सुरक्षा दलांनी केलेल्या गोळीबारात हे नक्षलवादी ठार झाले आहेत. गृहमंत्री अमित शाह यांनी 'एक्स' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर पोस्ट शेअर करत यासंदर्भातील माहिती दिली आहे.

# मुंबई पाण्याखाली जाण्याचा धोका ?

**नवी दिल्ली :** सिंगापूरच्या नानयांग टेक्नॉलॉजिकल युनिव्हर्सिटीने (एनटीयू) केलेल्या एका अभ्यासातून जगभरातील समुद्र किनाऱ्याजवळील शहरें चिंताजनक वेगानं बुडत असल्याचे समोर आले आहे.

संशोधकांच्या टीमने आशिया, आफ्रिका, युरोप आणि अमेरिका खंडातील 48 शहरें किती प्रमाणात बुडत आहेत याचा अभ्यास केला. हवामान बदलाच्या संकटामुळे समुद्राची पातळी वाढत आहे आणि त्यामुळे या शहरांचा भूभाग बुडण्याचा धोका आहे.

बुडण्याचा धोका असणाऱ्या भागांमध्ये जवळपास 16 कोटी लोक राहत असल्याचा अंदाज बीबीसीने सर्वेक्षणे



आणि संयुक्त राष्ट्रसंघाच्या लोकसंख्येवरील आकडेवारीच्या आधारे व्यक्त केला आहे. यामध्ये 48 शहरी भाग दाखवले आहेत. चीनमधील तिआनजिनमध्ये या शतकात अत्यंत वेगाने औद्योगिक आणि पायाभूत सुविधांचा विकास झाला आहे. याच तिआनजिनमध्ये भूभाग पाण्याखाली जाण्याचे सर्वाधिक प्रमाण दिसून आलं आहेएनटीयूच्या अभ्यासानुसार, 2014 ते 2020 दरम्यान मुंबईतील काही भाग दरवर्षी सरासरी 0.01 सेमी ते 5.9 सेमीनं पाण्याखाली गेला आहे.

या अभ्यासातून एनटीयूला आढळले की, मुंबईतील बुडालेल्या सर्वात महत्त्वाच्या भागांपैकी एक म्हणजे माटुंगा पूर्वेला किंग्स सर्कल स्टेशनजवळ असणारा परिसर. हा परिसर दरवर्षी सरासरी 2.8 सेमीनं पाण्याखाली गेला आहे.

नासाच्या नेतृत्वाखाली करण्यात आलेल्या विश्लेषणानुसार 2024 मध्ये समुद्राच्या पातळीत 0.59 सेमीची वाढ झाली होती. समुद्राच्या पातळीतील वाढीशी मुंबईतील बुडणाऱ्या भागाची सांगड घालता येते.

# महाराष्ट्रावर अवकाळी पावसाचे मोठे संकट

**मुंबई :**राज्यात गेल्या काही दिवसांपासून मुसळधार पाऊस सुरू आहे. महाराष्ट्राला अवकाळी पावसाने चांगलेच झोडपून काढले आहे. वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह सुरू असलेल्या पावसामुळे मोठे नुकसान झाले आहे, या पावसाचा पिकांना मोठा फटका बसला आहे, तसेच अवकाळी पावसामुळे काही ठिकाणी दुर्घटना देखील घडल्याचे समोर आले आहे. मुंबईसह, मराठवाडा, विदर्भ अशा सर्वच ठिकाणी सध्या जोरदार पाऊस पडत आहे. त्यातच आता चिंता वाढणारी बातमी समोर आली आहे. पुन्हा एकदा हवामान विभागाकडून मुसळधार ते अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. याबाबत हवामान शास्त्रज्ञ जालिंदर साबळे यांनी माहिती दिली आहे. सध्या हा पाऊस वादळी वारा आणि विजांच्या कडकडाटासह होत आहे. वाऱ्याचा वेग ताशी 50 ते 60 किलोमीटरपर्यंत जाऊ शकतो. काही भागांमध्ये हा पाऊस जोरदार ते अतिजोरदार स्वरूपाचा असण्याची शक्यता आहे. पुढील तीन दिवसांमध्ये दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रातील काही जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसाचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. सिंधुदुर्ग, रत्नागिरी, कोल्हापूर, सातारा, सांगली आणि पुणे जिल्ह्यांमध्ये जोरदार पाऊस होण्याची शक्यता आहे.हवामान विभागाने दक्षिण कोकण आणि दक्षिण मध्य महाराष्ट्रासाठी ऑरेंज अलर्ट जारी केला आहे. या अवकाळी पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान होत आहे, अशी माहिती जालिंदर साबळे यांनी दिली आहे. दरम्यान विदर्भातही पाऊस सुरूच आहे. गडचिरोली जिल्ह्यात आज जोरदार पावसानं हजेरी लावली अहेरी भामरागड एटापल्ली व सिरोंचामध्ये जोरदार पाऊस झाला आहे. शेतकरी संकटात सापडले आहेत.




# बानू मुश्ताक यांना इंटरनॅशनल बुकर पुरस्कार



**नवी दिल्ली :** भारतीय लेखिका, वकील आणि कार्यकर्त्या बानू मुश्ताक यांना 'हार्ट लॅम्प' या लघुकथा संग्रहासाठी आंतरराष्ट्रीय बुकर पुरस्काराने गौरविण्यात आले आहे. हा प्रतिष्ठेचा पुरस्कार मिळविलेले कन्नड भाषेतील हे पहिलेच पुस्तक आहे. 'हार्ट लॅम्प'चा इंग्रजी अनुवाद दीपा भास्ती यांनी केला आहे. या संग्रहात 1990 ते 2003 या तीन दशकांत बानू मुश्ताक यांनी लिहिलेल्या 12 लघुकथा समाविष्ट आहेत. या कथा दक्षिण भारतातील मुस्लीम महिलांचे जीवन आणि त्यांच्या संघर्षांचे चित्रण करणाऱ्या आहेत.

# बार्टीच्या 214 संशोधकांचा 4 वर्षापासूनचा संघर्ष थांबवणार : संजय शिरसाट

**पुणे :** बी.ए.एन.आर. एफ-2018 अधिछात्रवृत्ति पीएच.डी. संशोधक विद्यार्थी कृति समिती यांच्या मार्फत डॉ. बाबासाहेब आंबेडकर संशोधन व प्रशिक्षण संस्था, (बार्टी) पुणे यांच्याकडे यु.जी.सी च्या नियमांनुसार 5 वर्षे संशोधन अधिछात्रवृत्तीसाठी गेली चार वर्षे झाली, पाठपुरावा करित आहे. तरी देखील त्यांना अजूनपर्यंत न्याय देण्यात आला नाही. बार्टी ही संस्था राज्यातील अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थ्यांना संशोधनाकरिता अर्थसहाय्य करीत असते. सन 2013 पासून यु.जी.सी. च्या नियमांनुसार पीएच.डी संशोधनकांना अधिछात्रवृत्ती देण्याची तरतूद करण्यात आली व राज्यातील अनु.जाती प्रवर्गातील संशोधकांना एक नवी दिशा निर्माण झालेली आहे. BANRF -2018 पीएच.डी. 214 संशोधकांनी आपल्या न्यायिक हक्कासाठी यु.जी.सी नियमांनुसार पीएच.डी.साठी पाच वर्ष अधिछात्रवृत्ती मिळण्याकरिता गेल्या 4 वर्षापासून 5 वेळेस आमरण उपोषणे, 59 दिवस धरणे आंदोलने व चैत्यभूमी-दादर (मुंबई) या ठिकाणी जलसमाधी आंदोलन इत्यादी मार्गाचा अवलंब केल्यानंतर प्रशासनाने संशोधकांची दखल घेतली. तत्कालीन मुख्यमंत्री व सामाजिक न्यायमंत्री एकनाथ शिंदे यांनी आदेश दिल्यानंतर बार्टी प्रशासनाने संबंधित विषय मार्गी लावण्याचे आश्वासनात्मक पत्र दिले. तसेच बार्टीकडे निधि उपलब्ध असल्याकारणाने प्रशासनांवर बी.ए.एन.आर.एफ -2018 पीएच.डी. 214 संशोधकांचा आर्थिक भार पडणार नाही. असे असून देखील विद्यार्थ्यांचा 'प्रश्न अजूनही सामाजिक न्याय विभाग मुंबई मंत्रालायामध्ये प्रलंबित आहे'. सद्याचे सामाजिक न्यायमंत्री, संजय शिरसाट यांना संशोधकांनी फेलोशीप संदर्भात अडचणी सांगितले असता तातडीने प्रस्ताव सादर करण्याचे आदेश मंत्री महोदय यांनी सामाजिक न्याय विभागाला दिले.




## विद्यार्थ्यांची मागणी नियमबाह्य नाही हे खालील प्रमाणे –

1. यु.जी.सी/ एन.एफ.सी, पीएच.डी. करिता 5 वर्षे अधिछात्रवृत्ती प्रदान करते, तसेच बार्टी यु.जी.सी/ एन.एफ.सी च्या नियमांना अनुसरून अधिछात्रवृत्ती प्रदान करते.
2. बार्टीकडून 2018 च्या बॅचेचे अवार्ड लेटर 2020 मध्ये देण्यात आले आहे. म्हणून हे विद्यार्थी आपोआपच व्रक्ष्त्र-2019 च्या नियमावलीनुसार पाच (05)वर्ष अधिछात्रवृत्तीसाठी पात्र होतात. तसेच बार्टीने यु.जी.सी/ एन.एफ.सी नियमानुसार वेळोवेळी होणाऱ्या बदलानुसार अधिछात्रवृत्ती रक्कमेत बदल करून वाढीव रक्कम 2018 च्या पीएच.डी. संशोधकांना अदा केली आहे.
3. तीन सदस्यीय समितीच्या शिफारशीनुसार बी.ए.एन.आर.एफ -2018 अंतर्गत असलेल्या एम.फिल. च्या विद्यार्थ्यांना पुढे पीएच.डी. करीता देखील फेलोशिप नियमित देण्यात आली. म्हणजेच एम.फिल. करीता 2 वर्ष आणि पुढे पीएच.डी. करिता 3 असे एकूण पाच वर्ष फेलोशिप देण्यात आली आहे. ती यु.जी.सी च्या नियमानुसार योग्य आहे. परंतु त्याच बी.ए.एन.आर.एफ -2018 अंतर्गत असलेल्या 214 पीएच.डी. विद्यार्थ्यांची पाच वर्षाची मागणी असलेला विषय या बैठकीत फेटाळण्यात येतो हा अन्याय नाही का?
4. प्रत्येक नियामक मंडळाच्या (बी.ओ.जी) बैठकीमध्ये फेलोशिप संदर्भातील प्रश्नांबाबत त्तष्ट च्या नियमानुसार कार्यवाही करण्यात यावी. असे नमूद केले असताना देखील बी.ए.एन.आर.एफ -2018 पीएच.डी. 214 संशोधकांचा प्रश्न चार वर्षापासून मार्गी लागलेला नाही. महत्वाचे म्हणजे बी.ए.एन.आर.एफ -2018 ही बॅच कोविड-19 व लॉकडाऊन या गोष्टीमुळे विशेष बॅच म्हणून उल्लेख करून न्याय द्यावा.
5. बार्टी प्रशासनाने बी.ए.एन.आर.एफ -2019 पासून यु.जी.सी नियमानुसार 5 वर्ष अधिछात्रवृत्ती देण्याचा निर्णय घेतला आहे. ही मागणी 2018 चे विद्यार्थी करीत होते. त्याचा 2018 च्या विद्यार्थांना लाभ दिला नाही. त्यामुळे 2018 बॅच संदर्भात ही अन्यायकारक बाब आहे.
6. 23 ऑगस्ट, 2024 रोजी मुख्यमंत्री, बार्टी प्रशासन, सामाजिक न्याय विभागाचे सचिव, संबंधित अधिकारी व विद्यार्थी यांच्यामध्ये झालेल्या मीटिंग मधील चर्चेमध्ये एकूण सहा विषय मांडलेले होते. आणि ते सर्व विषय मार्गी लावण्याचे आदेश मुख्यमंत्री यांनी दिले होते. त्यापैकी पाच विषय मार्गी लागले असून, फक्त बी.ए.एन.आर.एफ -2018 पीएच.डी.चा एकच विषय प्रलंबित आहे. त्यासाठी लागणारा निधि 23, 23, 18, 400/- (अक्षरी रुपये - तेवीस कोटी तेवीस लाख अठरा हजार चारशे फक्त) बार्टीसंस्थेकडे उपलब्ध असल्याचे पत्र सामाजिक न्याय विभाग मुंबई व सबंधित विद्यार्थ्यांना देण्यात आले होते.

## वाचकांना आवाहन



दैनिक बहुजन सौरभची नागपूर शहरात सतत मागणी वाढत आहे. आपल्या घरी जो पेपर देतो. त्यांच्याकडे दैनिक बहुजन सौरभची मागणी करावी. आमच्या वर्तमानपत्राची स्वतंत्र अशी कोणतीही वितरण व्यवस्था नाही.

दैनिक बहुजन सौरभ नागपूर शहरात सर्वच पेपर विक्री केंद्रावरती उपलब्ध आहे. याची वाचकांनी नोंद घ्यावी.

मुख्य संपादक
दैनिक बहुजन सौरभ

“ जीवनातील प्रत्येक दिवस नवीन संधी घेऊन येतो, त्याचा लाभ घ्या! ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



## संपादकीय

# भारताच्या अभिमानी कन्येवर अत्यंत अपमानास्पद टिप्पणी

मध्य प्रदेशच्या भाजप सरकारचे आदिवासी व्यवहार मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरैशीसारख्या भारताच्या अभिमानी कन्येवर अत्यंत अपमानास्पद टिप्पणी केली, ज्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाच्या भावना दुखावल्या आहेत. मला कळत नाही की असे तर्कहीन लोक, ज्यांना बोलण्याची आणि कोणत्याही बंधनाशिवाय निरर्थक बोलण्याची सवय नाही, ते मंत्री कसे होतात? जो नेता देशाचा आणि त्याच्या सशस्त्र दलांचा आदर करत नाही आणि अत्यंत वाईट विधाने करतो त्याचा काय उपयोग? मध्य प्रदेशच्या भाजप सरकारचे आदिवासी व्यवहार मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरैशी सारख्या भारताच्या अभिमानी कन्येवर अत्यंत अपमानास्पद टिप्पणी केली, ज्यामुळे देशातील प्रत्येक नागरिकाच्या भावना दुखावल्या आहेत. महिन्यातील एका कार्यक्रमात, मंत्र्यांनी सैन्याच्या वतीने ऑपरेशन सिंदूरची माहिती देणाऱ्या कर्नल सोफिया कुरैशी यांना लक्ष्य करून एक अश्लील टिप्पणी केली. त्याची वृत्ती असभ्य आणि अत्यंत अपमानजनक होती. व्हायला हवे होते ते म्हणजे या भाषणाची व्हिडिओ लिंक पाहिल्यानंतर भाजप हायकमांडने विजय शाह यांना ताबडतोब मंत्रीपदावरून काढून टाकायला हवे होते, पण तसे झाले नाही. मध्य प्रदेश उच्च न्यायालयाने मंत्र्यांच्या लज्जास्पद टिप्पणीची स्वतःहून दखल घेतली आणि म्हटले की मंत्र्यांची भाषा असभ्य आहे. असे विधान केवळ वैयक्तिक बदनामीच नाही तर संस्था आणि सामाजिक रचनेवर हल्ला आहे. कर्नल कुरैशी हे दहशतवाद्यांची बहीण आहेत हे मंत्र्यांचे विधान अत्यंत अवांछनीय, अपमानजनक, द्वेषपूर्ण आणि फुटीरतावादी भावनांना प्रोत्साहन देणारे आहे. हे देशाच्या एकता, सार्वभौमत्व आणि अखंडतेला धोका आहे. त्यामुळे मंत्र्यांविरुद्ध तात्काळ एफआयआर दाखल करावा. यासाठी आदेशाचे पालन करण्यासाठी किंवा सर्वोच्च न्यायालयात जाण्यासाठी 4 तासांचा वेळ देण्यात आला होता. कोणतेही निमित्त ऐकले जाणार नाही. जर एफआयआर दाखल केला नाही तर डीजीपींविरुद्ध न्यायालयाचा अवमान केल्याची कारवाई सुरू केली जाईल. उच्च न्यायालयाचा कडक दृष्टिकोन पाहून पोलिसांनी महूच्या मानपूर पोलिस ठाण्यात मंत्र्यांविरुद्ध अजामीनपात्र कलमांखाली गुन्हा दाखल केला. बीएनएसविरुद्ध अशा कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला होता. ज्यामध्ये जन्मठेपेची शिक्षा देखील होऊ शकते. धर्म, जात आणि भाषेच्या आधारावर समाजात द्वेष आणि द्वेष पसरवण्याचा आणि भारताची एकता, अखंडता आणि सार्वभौमत्व धोक्यात आणण्याचा आरोप या मंत्र्यांवर आहे. उच्च न्यायालयाने म्हटले आहे की, लष्कर ही कदाचित या देशातील शेवटची संस्था आहे जिथे प्रामाणिकपणा, शिस्त आणि त्यागाचे अनोखे उदाहरण मिळू शकते. मंत्र्यांनी गटारीची भाषा वापरली. हा कोणत्याही अधिकाऱ्याचा नव्हे तर लष्कराचा अपमान करण्याचा प्रयत्न आहे, जो खपवून घेतला जाणार नाही. एखाद्याला केवळ त्याच्या धार्मिक ओळखीमुळे दहशतवादाशी जोडणे केवळ द्वेष पसरवत नाही तर संविधानाच्या विरुद्ध देखील आहे. पिढ्यानपिढ्या भारतीय सैन्याचा गौरव वाढवणाऱ्या कुरैशी कुटुंबाचा देशाला अभिमान आहे. मंत्र्यांच्या या हलक्याफुलक्या टिप्पणीमुळे देशातील प्रत्येक नागरिक दुखावला गेला आहे. कर्नल सोफिया कुरैशी यांच्याविषयी मंत्री विजय शाह यांनी केलेल्या वक्तव्याच्या चौकशीसाठी मध्य प्रदेश पोलिसांनी विशेष चौकशी समिती (एसआयटी) स्थापन केली आहे. भाजप नेते आणि मंत्री विजय शाह रविवारी इंदोर जिल्ह्यातील महूतील रायकुंडा गावात एका कार्यक्रमात संबोधित करत होते. त्यांचे वक्तव्य समाज माध्यमावर व्हायरल झाले होते. त्यांनी कर्नल सोफिया कुरैशी यांना 'दहशतवाद्यांची बहीण' म्हटले होते. सुप्रीम कोर्टाने या प्रकरणाच्या चौकशीसाठी तीन सदस्यीय एसआयटी स्थापन करण्याचा आदेश दिला होता. एका अधिकाऱ्याने सांगितले की सुप्रीम कोर्टाच्या आदेशानंतर मध्य प्रदेश पोलिसांनी सोमवारी रात्री उशीरा तीन सदस्यीय चौकशी समिती स्थापन केली. यासंदर्भात भोपाळ पोलिस मुख्यालय (गुन्हे अन्वेषण विभाग) यांचे एक आदेशपत्रही माध्यमातून शेअर केले आहे. या पत्रामधील माहितीनुसार स्थापन करण्यात आलेल्या समितीमध्ये प्रमोद वर्मा (आयपीएस, पोलिस महानिरीक्षक, सागर झोन), कल्याण चक्रवर्ती (आयपीएस, उप पोलिस महानिरीक्षक, विशेष सशस्त्र दल, पोलिस मुख्यालय, भोपाळ) आणि वाहिनी सिंह (आयपीएस, पोलिस अधीक्षक, जिल्हा डिंडोरी) यांचा समावेश आहे. विजय शाह यांनी सोफिया कुरैशी या देशाच्या भगिनी आहेत असे म्हटले आहे. त्यांच्याविरोधात दाखल झालेल्या एफआयआरनंतर हायकोर्टाने मध्यप्रदेश पोलिसांना देखील खडे बोल सुनावले आहेत. हायकोर्टाने म्हटले आहे की, विजय शाह यांच्याविरोधात दाखल झालेल्या एफआयआरमध्ये वादग्रस्त वक्तव्यासाठी लावणे अपेक्षित असलेली कलमे नाहीत. पुढे कोर्टाने म्हटले की, पोलीस तपास न्यायालयाच्या देखरेखीखाली होईल. न्या. बी. आर. गवई यांनी या प्रकरणावर भाष्य करताना म्हटले की, तुम्ही कशा प्रकारे वक्तव्य करत आहात? घटनात्मक पदावरील व्यक्तीकडून मर्यादाशील वर्तणुकीची अपेक्षा केली जाते. जेव्हा देश या गंभीर परिस्थितीतून जात आहे तेव्हा प्रत्येक शब्द जबाबदारीने बोलला गेला पाहिजे. ■ ■

बहुजन सौरभ

# घर घर संविधान, संविधान जागरुकतेसाठी 100 दिवसाचा विशेष कार्यक्रम सरकारने राबवावा !

घर घर संविधान - संविधान जागराचा - 100 दिवसाचा कार्यक्रम राबविणे बाबत मान. मुख्यमंत्री यांना संविधान फाउंडेशनचे वतीने दि. 14 मे 2025 च्या पत्राने विनंती केली आहे. हा कार्यक्रम, 15 ऑगस्ट ते 26 नोव्हेंबर 2025 या दरम्यान राबविण्यात यावा असेही सुचविले आहे.

संदर्भ :- 1. राज्य सरकारच्या सा.न्या. विभागाचा 10 ऑक्टोबर, 2024 चा शासन निर्णय. संविधान फाउंडेशन नागपूरचे माननिय मुख्यमंत्री यांना, 18 नोव्हेंबर 2024 चे, 6 डिसेंबर 2024 चे पत्र व 11 मार्च 2025 ची टीपणी/माझे मत, दि 20 मार्च 2025 चे पत्र. पत्र 14 मे 2025.

2. संविधान फाउंडेशन नागपूरच्या विनंतीचा विचार करुन, संविधानाला 75 वर्ष झाले हे निमित्त साधून 'घर घर संविधान कार्यक्रम' तत्कालीन पालकमंत्री नागपूर जिल्हा व राज्याचे उपमुख्यमंत्री (विद्यमान मुख्यमंत्री) यांनी पुढाकर घेतल्यामुळे महाराष्ट्रात साजरे करण्याचा निर्णय झाला. या जीआर अन्वये, 'घर घर संविधान कार्यक्रम' राज्यभर प्रभावीपणे राबविला जावा यासाठी मुख्यसचिव यांचे अध्यक्षतेखाली राज्यस्तरीय समिती गठित केली आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षतेत समिती आहे. या समितीने 10 ऑक्टोबर 2024 पासून आजपर्यंत काय काम केले. याचा आढावा घेण्याची गरज आहे. तीन महिन्यांपूर्वी सामाजिक न्याय विभागाकडे माहितीच्या अधिकारात अर्ज करून राज्यस्तरीय समितीच्या कामकाजाची/निर्णयाची माहिती, मी मागितली होती. अजूनही उत्तर आले नाही. माहितीच्या अधिकारात एक महिन्यात उत्तर देणे बंधनकारक असताना काहीच कळविले गेले नाही. आम्ही मेल केलेले पत्र, मुख्यमंत्री, मुख्य सचिव यांचेकडून सामाजिक न्याय विभागाकडे कार्यवाहीसाठी पाठविले जातात. तेथून प्रतिसाद/उत्तर मिळत नाही. आमचा अनुभव आहे. ,trocity ॲक्ट नुसार लीगल नोटीस पाठविली, त्यास सुद्धा उत्तर नाही. जनहिताचे, कायदा व योजना अंमलबजावणी बाबत आम्ही प्रश्न मांडत असतो. वैयक्तिक काही नाही तरी प्रतिसाद नाही. काय म्हणावे!



3. आम्ही मान .मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांना सांगू इच्छितो की त्यांचे पुढाकारामुळे निघालेल्या 10 ऑक्टोबर 2024 च्या निर्णयाची अंमलबजावणी प्रशासकीय अधिकारी करीत नसतील तर ते अयोग्य तर आहेच, शिवाय शासन निर्णयाची अवहेलना आहे. तेव्हा, विनंती केली आहे की संविधान अमृत महोत्सव साजरा करणेसाठी '100 दिवसाचा संविधान जागरुकता कायक्रम' राज्यभर राबविण्यात यावा. मंत्रालयीन विभाग, विभागीय आयुक्त, महानगर पालिका आयुक्त, जिल्हाधिकारी, सीइओ जिल्हा परीषद, पोलिस आयुक्त, पोलिस अधिक्षक, राज्यस्तरीय विविध विभागाचे संचालक/ आयुक्त, विद्यापीठे, यांना 100 दिवसाचा कार्यक्रम देण्यात यावा. 15 ऑगस्ट ते 26 नोव्हेंबर 2025 असा 100 दिवसाचा कालावधी असू शकतो. केलेल्या कामांचे मूल्यमापन 26 जानेवारी 2026 पूर्वी करून उत्तम कार्य करणाऱ्या अधिकाऱ्यांना 'डॉ. भीमराव रामजी आंबेडकर संविधान सन्मानपत्र' देवून, किंवा अन्य नावाने, त्यांचा गौरव करण्यात यावा. आम्ही संविधान फाऊंडेशनचे वतीने, संविधान जागरुकतेसाठी उत्तम कार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था, पत्रकार, इत्यादींचा, डॉ. भीमराव रामजी आंबेडकर संविधान सन्मानपत्र देवून गौरव करण्याचा उपक्रम आम्ही 2018 पासून सुरू केला आहे. या वर्षी सुद्धा आयोजन करीत आहोत.

**माझे मत**



ई. झेड. खोब्रागडे
9923756900

4. मान. मुख्यमंत्री यांनी शपथ ग्रहण केल्यानंतर 100 दिवसाचा कार्यक्रम सर्व विभागांना दिला होता. त्याचे मूल्यमापन होवून उत्कृष्ठ काम करणाऱ्या मंत्रालयीन विभागांची, राज्यस्तरीय विभागांची, आयुक्त, कलेक्टर, सीइओची क्रमवारी लावून त्यांना पुरस्कृत करण्यात आले. हीच प्रक्रिया तालुका स्तरापर्यंत गेली. या 100 दिवसाच्या कार्यक्रमांमुळे अनेक नावीन्यपूर्ण गोष्टी झाल्यात, तक्रारींचे, समस्यांचे निराकरण होण्यास मदत झाली. निर्णप्रक्रियेत गतिमानता आली, संवेदनशीलता आली. वृत्तपत्रांच्या बातम्यांवरून तरी तसे कळते. 100 दिवसाच्या कार्यक्रम लागू केल्यामुळे आणि मूल्यमापन पद्धत ठरविल्यामुळे हे घडले म्हणू या. खरे तर शासन प्रशासनाचे हे रोजचेच काम आहे. रोजच असे घडायला पाहिजे. तरच good governance आहे असे म्हणता येईल. जे झाले त्यासाठी सर्वांचे अभिनंदन आणि हे काम असेच सातत्याने होत राहील ही अपेक्षा आहे.

5. मुख्यमंत्री महोदयांना विनंती आहे की महाविद्यालय व विद्यापीठात, संविधान अभ्यास केंद्र Center for Constitutional Studies, सुरू करण्यात यावे. यामुळे, राज्यातील सर्व कॉलेजेस व विद्यापीठात संविधान जागरूकतेचे विविध कार्यक्रम जे 10 ऑक्टोबर 2024 च्या जीआर मध्ये आहेत, ते सातत्याने व प्रभावीपणे राबविले जातील. हस्स चे कार्यक्रम अधिकारी यांचेवर किंवा अन्य एका प्राध्यापकांवर जबाबदारी देता येईल. जीआर चा उद्देश सफल होवू शकेल. दि. 10 ऑक्टोबर 2024 च्या जीआर मध्ये उल्लेख आहे की 36 ही जिल्ह्यात संविधान संमेलने होतील, अजूनतरी एकही झाले नाही. जीआर मधील अनेक विषय दुर्लक्षित आहेत. हा जीआर ग्रामपंचायत पर्यंत पोहचला का? त्याचे वाचन झाले का?, घर घर संविधान हा कार्यक्रम सुरू झाला आहे का? हे तपासण्याची आवश्यकता आहे, मूल्यमापन आवश्यकच आहे. मंत्रालयापासून गावपातळी वरील सर्व कार्यालयात या बाबत काय सुरू आहे याकडे अधिकाऱ्यांचे लक्ष आहे असे दिसत नाही.

6. संविधान सर्वोच्च आहे हे सर्वमान्य आहे. सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधीश यांनी वारंवार सांगितले आहे. तरीपण, प्रशासन संविधानाला महत्त्व देताना दिसत नाही. विद्यमान सरकारला संविधान सर्वोच्च असून त्याचा जागर करणे सरकारचे कर्तव्य आहे हे वाटत नसेल तर तसे सांगावे. त्यामुळे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी आणि सरकारने जाहीर केलेला कार्यक्रम गावोगावी घरोघरी पोहचावा यासाठी हा 100 दिवसाचा कार्यक्रम सुचवला आहे. संविधान जागरूकतेबाबत सरकार संवेदनशील आहे हे कृतीतून दिसुन आले पाहिजे. गडचिरोली जिल्हा अति मागास, नक्षलग्रस्त, आदिवासी जिल्हा म्हणून परिचित आहे. या जिल्ह्यातील किती लोकांना संविधान माहीत असेल? नागपूर जिल्ह्यात तर 2005 पासून संविधान जागर सुरू आहे. तेव्हा हे दोन्ही जिल्हे 'संविधान जागरूक जिल्हा' म्हणून घोषित करता येइल अशा रीतीने संविधान जागरूकता अभियान राबविले पाहिजे. आम्ही संविधान फाऊंडेशनचे वतीने घर घर संविधान हे अभियान सुरू केले आहे. 29 मे 2025 ला पेरीमिली या आदिवासी भागात दिवासभऱ्याची संविधान परिषद आयोजित केली आहे. 31 मे 25 ला संविधान प्रशिक्षण कार्यशाळा आलापल्ली येथे आयोजित केली आहे. आम्हास जमते तेवढे करण्याचा आमचा प्रयत्न असतो. ■ ■

# मनुष्य प्राणी शाकाहारी आहे की मांसाहारी ?

पुनरुत्पादन : एकदा शिक्षकाने आपल्या 10 व्या वर्गाच्या मुलांना विचारले की तुम्ही कुठेतरी बाहेर फिरायला गेलेत आणि समोर एखादी अळी, माकोडा, मुंगी, साप, सरडा किंवा गाय-म्हैस किंवा इतर कोणत्याही विचित्र प्राणी, जे आपण आयुष्यात यापूर्वी कधीही पाहिले नव्हते, मग प्रश्न येतो की आपण कसे ओळखाल तो जीव अंडी देतो की किंवा पिल्लांना जन्म घालतो? त्याची ओळख काय आहे? बहुतेक मुले शांत राहतात. काही मुले आपसात बोलत असतात. काही वेळेनंतर शिक्षक म्हणतात की हे सोपे आहे.

**प्राण्यांचे कान :** जे प्राणी, ज्यांचे कान बाहेर दिसतात ते पिल्लांना जन्म घालतात आणि ज्यांचे कान बाहेर दिसत नाहीत ते अंडी घालतात. मग शिक्षक दुसरा प्रश्न विचारतात मला हे सांगा, आपण आपल्या समोर एखादा प्राणी आला तर कसे ओळखाल की तो शाकाहारी आहे की मांसाहारी? कारण आपण त्याला यापूर्वी कधी खातांना पाहिले नाही. मुलांमध्ये उत्सुकता जागृत होते आणि ते आपसात बोलू लागतात. शिक्षक म्हणाले - पहा बाळांनो खूप सोपे आहे.

**डोळ्यांची रचना :** सर्व प्राणी ज्यांची डोळ्यांची वरची रचना गोलाकार असते असे प्राणी मांसाहारी असतात, जसे की मांजर, गरुड, पक्षी, सिंह, वाघ, लांडगा, किंवा आपल्या सभोवतालच्या कोणत्याही प्राण्याचे, ज्यांचे डोळे गोलाकार असतील, ते मांसाहारी असतील. त्याचप्रकारे, ज्या प्राण्यांचे डोळे लांब असतात ती सर्व शाकाहारी असतात, जसे हरण, गाय, हत्ती, बैल, म्हशी, बकरी इ. मग त्या शिक्षकाने मुलांना विचारले - मुले आता सांगा, की मनुष्याचे डोळे गोल आहेत की लांब? यावेळी सर्व मुले म्हणाली की माणसाचे डोळे लांब आहेत. त्यानंतर शिक्षकांनी मुलांना विचारले की हे सांगा, या नियमानुसार मनुष्य प्राणी शाकाहारी आहे की मांसाहारी? सर्व मुलांनी उत्तर दिले मनुष्य प्राणी शाकाहारी आहे. मग शिक्षकाने अजून शाकाहारी होण्याचे घटक विद्यार्थ्यांना समजावून सांगितलेत.

**तीक्ष्ण नखे :** ज्यांचे नखे तीक्ष्ण असतात ते सर्व प्राणी मांसाहारी असतात, जसे सिंह, वाघ, मांजर, कुत्री, गरुड, गिधाड किंवा इतर कोणतेही तीक्ष्ण नखे असलेले प्राणी हे मांसाहारी असतात आणि ज्यांचे नखे रुंद सपाट असतात ते प्राणी शाकाहारी असतात, जसे माणूस, गाय, घोडा, गाढव, बैल, हत्ती, उंट, हरण, बकरी इ. तर मानवांचा जो हाथ आणि पंजा आहे तो फळ तोडण्यासाठी असतो, तर वाघासारखा तीक्ष्ण नखे असलेला पंजा शिकार करण्यासाठी असतो. त्यानुसार, आता मला सांगा की माणसाची नखे तीक्ष्ण आहेत कि रुंद सपाट आहेत? सर्व मुले असे म्हणाले रुंद सपाट. मग शिक्षकाने विचारले आता हे सांगा, कोणत्या श्रेणीत मानव प्राण्यांची गणना होईल ? सर्व मुले एकसंघपणे म्हणाली शाकाहारी.



डॉ. सुनिल भगत
मो. 94230 64391




**घाम येणे :** शिक्षकांनी या गोष्टीला अजून सविस्तर उत्तर देत मुलांना सांगितले की, सर्व प्राणी ज्यांच्या शरीराला घाम येतो, ते सर्व शाकाहारी आहेत, जसे- घोडा, बैल, गाय, म्हशी, खेचर इ. बरेच प्राणी तर मांसाहारी प्राण्यांना घाम येत नाही, म्हणून नैसर्गिकरित्या, ते प्राणी जीभ काढून लाळ गाळत असतात. अशा प्रकारे ते त्यांच्या शरीराची उष्णता नियंत्रित करतात. तर प्रश्न उद्भवतो. माणूस शरीराचे तापमान संतुलन घाम गाळून करतो की जीभेने लाळ गाळून करतो? सर्व मुले म्हणाली की माणूस घाम गाळतो, शिक्षक म्हणाले की मला ते सांगा ह्या गोष्टीबरोबर सिद्ध झाले की माणूस मांसाहारी की शाकाहारी? सर्व मुले एकासोबत ओरडली - शाकाहारी.

**पचन संस्था :** शाकाहारी माणूस कसा माहितीच्या अभावाने मांसाहार करतो आणि असे म्हणतात की जेव्हा अन्न पिकवले जात नव्हते किंवा नंतर शिजवले जात नव्हते म्हणून तो मांस सेवन करीत असे, असा समज चुकीचा आहे, माणसांची पचन प्रणाली ही सुद्धा शाकाहार पचवण्यासाठी असते. त्यांचे लहान आतडे हे 9 ते 16 फुट लांब असते तर मोठे आतडे 5 फुट लांब असते उलट वाघाची लहान आतडी माणसापेक्षा लहान असते कारण मांसाला पचनासाठी गुंतागुंत पचन संस्था लागत नाही जी तंतुमय शाकाहारी पदार्थासाठी योग्य असते. म्हणून मानव हा मूलतः शाकाहारी प्राणी आहे आणि तो प्राचीन काळापासून कंद आणि फळांवर जगत होता, जे योग्य आहे आणि त्याची रचना आणि निसर्गाशी देखील जुळते.अश्या प्रकारे शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मानव प्राणी कसा शाकाहारी आहे, हे प्राण्यांच्या पुनरुत्पादन, कानांची, डोळ्यांची, नखांची रचना, घाम जाणे, पाचन संस्था ह्या विविध घटक आणि उदाहरणे देऊन स्पष्ट केले. शिक्षकांनी शाकाहारी असण्याची पूरक उदाहरणे दिलीत तरीसुद्धा मानव प्राणी हा गेल्या लाखो वर्षांपासून मिश्राहारी आहे हे सर्वश्रुत आहे. ते आपण नंतरच्या लेखात पाहू या. ■ ■

# निष्ठावंत सामाजिक कार्यकर्ता नरहरी पेंदाम

**ध्येय मोठे असले पाहिजे, त्याच्या परिपूर्तीसाठी कठोर परिश्रम, त्याग आणि संघर्ष करण्याची मनात जिद्द असेल तर यश नक्कीच मिळतो. यावर माझा आत्मविश्वास आहे.**

दि 16 एप्रिल 1960 रोजी एका गरिब आदिवासी कुटूंबात माझा जन्म झाला. मी नरहरी जनार्धन पेंदाम. राहणार भिवापूर, जि. नागपूर. आईचे नाव लक्ष्मीबाई. वडील जनार्धन पेंदाम गरिब आदिवासी धार्मिक प्रवृत्तीचे होते. घरची परिस्थिती हलाखीची असल्याने माझे बालपण कसे असेल याविषयी कल्पना न केलेली बरी. परंतु माझे वडील मला प्राथमिक शिक्षणासाठी कोष्टीपूरा (कबीरवाडा) येथे प्रवेशासाठी नाव नोंदले. मला माझे वडिलांनी शिक्षणाचे पहिले द्वार दाखविल्यामुळे सतत त्यांच्या प्रेरणेमुळे मला माझे ध्येय पूर्ण करता आले. एस.एस.सी. पर्यंतचे शिक्षण भिवापूर एज्युकेशन सोसायटीच्या शाळेत झाले. शाळेत शिकत असतांना परिसंवाद, गीत गायन स्पर्धेत सहभाग असायचा. स्पर्धामध्ये प्रथम आल्याने मला अनेक मान्यवरांच्या हस्ते पारितोषिक मिळाले आहेत. त्यामुळे माझा परिचय विद्यार्थ्यांमध्ये होता. मला पुढील शिक्षणासाठी म्हणजे बीए. करिता सी.पी. ॲण्ड बेरार महाविद्यालयात बीए. द्वितीय परिक्षा उत्तीर्ण झालो. आई-वडिल शेतमजूर असल्यामुळे आर्थिक अडचणीमुळे परत घरी यावे लागले. तद्नंतर बीए फायनल करीता उमरेड येथील आदर्श महाविद्यालयात प्रवेश घेतला. शेवटी बीए. परिक्षा पास झालो. माझ्या आनंदाला पारावार नव्हता. माझ्या कुटूंबातील मी पहिला पदवीधर होतो. एका गरिब आदिवासी शेतमजूराचा मुलगा पदवीधर होतो, यावर विश्वासच बसत नव्हता. विविध स्पर्धा जसे वादविवाद, परिसंवाद, संगित, गायन कला मध्ये अभिरूची असल्याने अभिनंदनाची थाप पाठीवर असायची. महाविद्यालयात शिकत असतांना विविध सामाजिक संघटनाशी संबंध आले. त्यातूनच सामाजिक कार्य करावे असे वाटायचे. परंतु घरच्या आर्थिक समस्यामुळे उच्च शिक्षण घेता आले नाही. पदवीधर असल्यामुळे माझी निवड जि.प. येथील सिंचन विभागात 'मस्टर असिस्टंट' म्हणून झाली. भिवापूर येथे सिंचन विभागात 4-5 वर्षे काम केले. पुढे आमच्या परिसरात ॲग्रो कंपनीची सुरूवात झाली. सिंचन विभागाची नौकरी सोडून ॲग्रो कंपनीत परत काही वर्षे पर्सनल असिस्टंट पदावर काम केले. ग्रामपंचायत निवडणुका उत्थानासाठी राजकारणात प्रवेश घ्या अशा प्रकारचा आग्रह असल्याने मला नोकरी सोडावी लागली. मी ग्रामपंचायत सदस्य म्हणून निवडणूकीत प्रत्यक्ष भाग घेतला. मी निवडून आलो. लोकांच्या प्रेमाने, सहानुभूतीमुळे मला ही सुवर्णसंधी प्राप्त झाली. मी सामाजिक कार्यात हिरीरीने भाग घेता घेता, सामाजिक, शैक्षणिक, राजकीय कार्य करीत पुन्हा राजकीय, सामाजिक कार्य करणाऱ्या नेत्यांशी संबंध वाढत गेले. लोकांची सेवा करण्यासाठी न्यायालयात काम करण्यासाठी पुनःश्च सुवर्ण संधी प्राप्त झाली. लोक अदालतमध्ये पॅनल सदस्य म्हणून काम करीत लोकप्रिय झालो. 'विधी स्वयं सेवक' या पदावर काम करतांना नविन अनुभव आले. न्यायालयात पिडीत, गरिब, समाजातील लोकांना सहकार्य करून त्यांना न्याय देण्यासाठी विधी स्वयं सेवकाची भूमिका फारच महत्वाची आहे. विधी स्वयं सेवक म्हणून काम करतांना माझ्याकडे एका मुलीची (गरिब, असहाय) करूण व्यथा असून तिला न्याय मिळण्याची शाश्वती नव्हती. एका हत्येच्या प्रकरणात मुलीच्या तिचे आई-वडिल आजीवन कारावास भोगत होते. अर्थातच आईवडिल जीवंत असतांनी ती मुलगी अनाथ झाली. तिचे जगणे कठीण झाले. आईवडील कधीतरी जेलमधून सुटतील या आशेवर जगत होती. निराधार, असहाय मुलगी असल्याने शेजारधर्माच्या जाणिवेने एक बाईने तिला जवळ केले. परंतु तिचे शिक्षण, पुनर्वसन आणि भवितव्य काय? आर्थिक समस्या, शिक्षण आणि जीवन संघर्ष वाढतच गेले. मी सर्वतोपरी त्या मुलीला सहकार्य केले तथा तिचे पुनर्वसनासाठी प्रयत्न केल्याने मला मनस्वी समाधान मिळाले. न्यायालयाने माझ्या सदरील कार्याची दखल घेतली तथा पुरस्कारासाठी शिफारस केली ही माझ्यासाठी फार मोठी बाब आहे, पुरस्कारापेक्षा त्या मुलीला मदत करण्यात जो आनंद मला मिळाला यातच मला समाधान आहे. 'सेवा ही सेवेची जाण' ही भावना मनाशी गाठ बांधून समाजाचा विकास तथा प्रगतीसाठी आईवडीलांच्या आशिर्वादाने आणि समाजातील अमाप प्रेमामुळे मी हे काम करू शकलो व पुढेही करीत राहणार यातच माझे सुख व समाधान आहे.

**आदिवासी अस्तित्व**



प्रा. डॉ. वामन शेळमाके
मो. 9420973248

क्रमशः ■ ■

# देशाच्या सर्वोच्च पदावर ओबीसी, एससी, एसटी




आज देशात जर खऱ्या अर्थाने विचार केला तर देशातील जी प्रमुख पदे आहेत ती म्हणजे प्रधानमंत्री, राष्ट्रपती आणि सर्वोच्च न्यायालयाचा न्यायाधीश होय. या बाबतीत आपण जर पाहिले तर लक्षात येईल की, भारतीय संविधानाच्या कलम, 340, 341, 342 म्हणजे ओबीसी, एससी, एसटी, साठी राखीव असे आहे. म्हणजे इतर मागासवर्गीय, मागासवर्गीय आणि अनुसूचित जमाती होय. या वर्गातील प्रगतीच्या दृष्टीने संविधानमध्ये तरतुदी करण्यात आलेल्या आहेत. या तिन्ही पदावर असलेल्या लोकांनी कधीही स्वप्नात देखील विचार केला नसेल की ते देशातील लोकांना न्याय देणारे प्रमुख पदे आहेत. त्यावर विराजमान होतील आणि सर्वांना दाखवून देतील की लोकशाहीमध्ये ज्ञानाला आणि लोकांच्या मताला विशेष महत्व असते. ही सारी किमया भारतीय संविधानाची आहे. आपल्या देशासंदर्भात विचार केला तर आपल्या लक्षात येईल की आपल्या देशावर इंग्रज यांचे राज्य होते. अनेक जाती होत्या, जातीभेद होता, अनेक बोलीभाषा होती, अनेक धर्म होती, अनेक राज्य होती आणि अन्याय अत्याचाराने तर धुमाकूळ घातला होता. ज्यावेळी अन्याय-अत्याचार वाढतो त्यावेळी, ज्या दिवशी अन्याय सहन करण्याची मर्यादा संपते. त्यावेळी ज्यावर अन्याय होती ती सारी माणसे एकत्रित होतात. आणि अन्यायाला समूळ नष्ट करतात. अशाच प्रकारे भारतीय समाज हा जात आणि धर्माच्या पलीकडे जाऊन एक माणूस म्हणून देशाच्या स्वातंत्र्याच्या आंदोलनात सहभागी झाला आणि पहाता, पहाता हे आंदोलन एवढे मोठे झाले की, इंग्रज यांना भारताला स्वातंत्र्य नाईलाजाने देण्याचे मान्य करावे लागले. यालाच म्हणतात, जात, पात, धर्म, पंथ बाजूला सारून देशाच्या हितासाठी लढणे म्हणजे देशप्रेम होय. हे देशप्रेम सदा कायम राहावे यासाठी संविधानाच्या प्रस्तावनामध्ये अगदी सुरवातीला 'आम्ही भारताचे लोक' या वाक्याने केली आहे. या वाक्यात कुठेही जात, पात, धर्म आणि पंथ दिसत नाही. केवळ देश दिसते आणि शेवटच्या वाक्यात 26 नोव्हेंबर 1949 रोजी हे संविधान अधिनियमित आणि अंगीकृत करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत असे लिहले आहे. म्हणजे या देशातल्या प्रत्येक माणसाने संविधान मान्य केले आहे आणि जे लोक संविधान मान्य करीत नाहीत. त्यांना देश स्वतंत्र व्हावा असे कधीही वाटले नसेल. याचा अर्थ देशाशी द्रोह आहे असा होतो. अशी जी जी लोक आहेत ती सर्व देशात कलह निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, मी पहिल्यांदा भारतीय आहे आणि अंतिमही भारतीय आहे. ही भारतीयत्वाची भावना ज्या लोकात असते ते खरे देशप्रेमी होय. मी पणा, अहंकार, स्वार्थ, द्वेष हा माणसाला, माणसापासून दूर घेऊन जातो आणि एकदा मनाने आणि हृदयातून दूर गेलेली माणसे जवळ येत नसते. हे वास्तव आहे आणि जेव्हा ती मनातून जवळ येतात त्या समोर कोणीही टिकू शकत नाही. हे भारतीय लोकांनी आपल्याला स्वातंत्र्याच्या लढ्यात झोकून देऊन स्वातंत्र्य मिळवून सिद्ध केले आहे आणि आता हे मिळालेले स्वातंत्र्य कसे चिरकाल कायम टिकून राहील हे देशात सर्वोच्च पदावर विराजमान असणाऱ्याची फार मोठी जबाबदारी आहे. ते ती कशी पार पाडतात यावर लोकांचे हित, लोकांचे कल्याण, जनतेचा विकास, देशाची ऐकता आणि अखंडता अवलंबून असते. भारतीय संविधानाने तीन प्रमुख अंगावर न्याय देणाऱ्या संस्थांवर देशाची जबाबदारी दिली आहे. शासन, प्रशासन आणि न्याय पालिका, या तिन्ही प्रमुख यांना जात, पात, धर्म, पंथ पाळता येत नाही. आपल्या देशात अनेक जाती आहे, धर्म आहे, बोलीभाषा आहे, राज्य आहे, अनेकांच्या मनात, उच्चनीचतेची भावना आहे. या सर्व कारणाने देशाची एकता आणि अखंडता कायम ठेवणे तारेवरची कसरत होती. त्यामुळे त्यावेळी असलेल्या संविधान सभेतील लोकांनी या सर्व त्याकाळी असणाऱ्या परिस्थितीचा विचार करून, आपसात कलह निर्माण होऊ नये आणि देश चिरकाल एकसंघ राहावा या हेतूने सर्व धर्मांना समान अधिकार देण्यात आले. संविधान सभेतील सभासद यांनी विचारलेल्या, सुचविलेल्या अनेक प्रश्नांना योग्य आणि समर्पक उत्तरे देऊन योग्य ते भारतीय संविधानमध्ये समाविष्ट करण्यात आले आणि संविधानाच्या प्रास्ताविकमध्ये अगदी सुरवातच 'आम्ही भारताचे लोक' या वाक्याने केली आहे. या वाक्यात कुठेही कोणालाही, म्हणजे कोणत्याही धर्माला, किंवा जातीला विशेष महत्व दिल्या गेले नाही. म्हणजे उच्च, नीचतेची भावना संपुष्टात येते. मधात स्वातंत्र्य, समता, बंधूभाव आणि समान न्याय देण्यासाठी कटीबद्ध राहण्यास शेवटच्या वाक्यात 26 नोव्हेंबर 1949 रोजी हे संविधान अधिकृत आणि अधिनियमित करून स्वतः प्रत अर्पण करीत आहोत असे म्हटले गेले आहे. आजही विधानसभा, किंवा लोकसभामध्ये निवडून गेलेल्या प्रतिनिधींना, संविधानाप्रमाणे काम करण्यास कटीबद्ध राहील असे शपथेवर म्हणावे लागते. तो किंवा ती शपथ किती अंमलात आणतो हा ज्याचा त्याचा भाग आहे. पण संविधान निर्माता, भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब भीमराव आंबेडकर यांनी देश एकसंघ रहावा यासाठी संपूर्ण तरतूद करून ठेवली आहे. त्यामुळे आपल्या देशात अनेक, जाती, अनेक धर्म, अनेक बोलीभाषा, अनेक राज्य असतांना मागील 75 वर्षात आपण गुण्या गोविंदाने राहत आहोत ही सारी किमया संविधानमुळे आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या बुद्धी कौशल्यामुळे झाली आहे. हे संपूर्ण जग मान्य करते. पण देशातल्या काही लोकांना ते मान्य नसेल. कारण त्याच्या डोक्यात कुठेतरी जात आणि उच्चनीचतेची भावना घर करून असेल. त्यामुळे कदाचित संविधान बदल करण्याची भाषा अनंत कुमार हेगडे सारखे काही बोलतात. अशी माणसे देशातील एकता आणि अखंडता कायम संपुष्टात आनेल का? ही भीती काहींना वाटते. आज देशात सर्वोच्च पदावर असणाऱ्या संदर्भात विचार केला तर आपल्या भारत देशाचे सन्माननिय, प्रधानमंत्री, नरेंद्र मोदीजी हे ओबीसी(obc) प्रवर्गा मध्ये येतात, सर्वोच्च न्यायाधीश बी. आर. गवई ही एससी(sc) प्रवर्गामध्ये येतात आणि राष्ट्रपती महोदया, द्रोपदी मुर्मू या एसटी, (st) प्रवर्गामध्ये येतात. पण यांना जात, पात, धर्म, पंथ पाळता येत नाही. म्हणजेच त्याना समान न्याय भारतीय जनतेला द्यायचा आहे. ज्या वर्ण व्यवस्थेमुळे ज्या, ज्या समाजातील लोकांना अधिकार नाकारले गेले होते. पण आज आपल्या देशात लोकशाही असल्यामुळे आणि भारतीय संविधान हे धर्म निरपेक्ष असल्याने सर्वांना संधी मिळालेली आहे आणि ही भारतीय संविधानाची आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या परिश्रमाची बुद्धी कौशल्याची देन आहे. हे आज सर्वोच्च पदावर असणारे आणि पूर्वीही होऊन गेलेले यांनी समजण्याची गरज आहे. देशाला एकसंघ ठेवण्याची गरज आहे. आपल्या देशात जे, जे धर्म आहे त्याचे पूजा स्थान म्हणजे मंदिर असेल, मज्जीद असेल, चर्च असेल, या गुरुद्वारा असेल ते ते प्रमुख म्हणजे त्याचे, त्याचे व्यवस्थापन करतात. त्यामुळे अलीकडे बुद्धगया मधील महाबोधी महाविहार बौद्धांच्या ताब्यात द्या अशी मागणी सर्व स्तरातून होत आहे. मागील तीन महिन्यापासून आंदोलन भिक्कू वर्ग आणि उपासक वर्ग करीत आहे. बुद्धाचा विचार हा जगात अनेक देशात आहे आणि बुद्धानी मानव कल्याणाचा विचार जगाला सांगितला आहे. त्यामुळे आपल्या संपूर्ण भारतीय लोकांची जबाबदारी आहे की आपण सर्व बंधूभावाने राहणे हे देखील आपले कर्तव्य आहे. आज भारत देशाच्या सर्वोच्च पदावर, ओबीसी, एससी, एसटी विराजमान आहेत. हे मात्र नक्की, ही भारतीय संविधानाची देन आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची देन आहे. हे विसरता कामा नये. त्यामुळे सर्वोच्च पदावर असणाऱ्यांनी समान न्याय द्यावा ही भारतीयांची किमान अपेक्षा आहे. ■ ■



अविनाश टिपले
मो.9970917389

“ सेवा जवळून, आदर दुरून आणि ज्ञान आतून असावे ! ”

बहुजन सौरभ
BAHUJAN SAURABHA



# भगवान बुद्धांनी उत्कृष्ट गृहस्थ आदर्श मंगलमयी जीवन जगण्यासाठी सिगाल ला केलेला उपदेश

## सिगालोवाद सूत्त

*राजगृह नगरी मगध प्रदेशाची राजधानी वैविध्यपूर्ण, नाना तऱ्हेचे लोक राहत होते. सिगाल नावाच्या मुलाचे आईवडील धार्मिक, शीलवान, गुणवान तसेच भिक्षुसंघाला दान, पंचशीलाचे पालन तसेच उपोसथ करीत असत. आई वडिलांना नेहमीच वाटायचे आम्ही धर्माचरण करतो परंतू आपला मुलगा धार्मिक बनला पाहिजे. यासाठी ते प्रयत्न करीत असत.*

असंख्य लोक तथागताकडे जाऊन पुण्यवान, श्रद्धावान बनले. सिगालला वाटायचे, भगवान बुद्धांकडे गेलो तर खाली बसून वंदन करावे लागेल, झुकावे लागेल, खूप ऐकून घ्यावे लागेल, दान द्यावे लागेल, अशा अनेक बाबी सिगालला मान्य नव्हत्या. आई वडिलांना खूप वाईट वाटायचे. हतबल होणारे मायबाप आपण मुलाला घडवू शकलो नाहीं असे वारंवार वाटायचे. सिगाल सर्व प्रकारच्या इंद्रिय सुखाचे कर्म, मित्रांसोबत मौजमजा करायचा अतिव दुःखाने वडील मृत्यू शय्येवर असतांना पित्याच्या करुणेने ते म्हणाले, 'आतापर्यंत तू माझे ऐकले नाहीं, माझ्या मरणानंतर माझी शेवटची इच्छा पूर्ण करशील. मी फार मृत्युच्या जवळ आहे. शेवटचा सल्ला म्हणून ऐक - सुखपूर्वक जीवन जगायचे असेल तर तू षडदिशांची पुजा करशील.' वडिलांच्या मृत्यूनंतर सिगालला वडिलांनी सांगितलेल्या संकल्पाची आठवण झाली आणि तो सहा दिशांची पुजा करू लागला. राजगृह येथील वेळुवनातील कलंद निवासात तथागत विहार करीत होते. त्यावेळी त्यांनी बघितले की एक तरुण पसकाळी उठून ओले केस आणि ओले कपड्यांनी हात जोडून सर्व दिशांची पुजा करीत आहे. हे तथागतांनी पहिले आणि त्याला विचारले तू शड दिशांची पुजा का करीत आहेस? त्यावर सिगालने उत्तर दिले की, आकाश, पृथ्वी आणि सर्व दिशांची पुजा करीत जा. वडिलांच्या आज्ञाचा मान राखण्यासाठी मी अशा रीतीने पुजा करीत आहे'. तथागत त्याला म्हणाले शहाण्या माणसाला हा धर्म ठरतो का? सिगाल म्हणाला, 'शहाण्या माणसाला धर्म कोणता? हे सांगण्याची विनंती केली. तथागत म्हणाले,' 'उत्तम गृहस्थ होण्यासाठी स्वहीत करुण घ्यायचे तर प्राणघात, चोरी, व्याभिचार, असत्य भाषण / खोटे बोलणे या चार कर्मकलेशपासून दूर रहावे'

* **'प्राणघात'** - प्राणघात करू नका तर कुशल कर्म करा. * **'चोरी कर्म करू नये'** - चोरी कर्म करणाऱ्यांची संगत करू नये, सज्जनांची संगत करावी. * **'व्यभिचार करणे'** - नीतिमत्ता ढसाळलेल्या लोकांमुळे सामाजिक हानी होते. अशा व्यक्तिपासून अलिप्त रहावे. * **'असत्य भाषण'** - चुगली करण्यापासून, खोटे बोलण्यापासून, कठोर बोलण्यापासून, निरर्थक, व्यर्थ बडबड, लोभापासून, द्वेष, मत्सर यापासून अलिप्त रहावे म्हणजेच काय करायचे तर त्रिसरणांसहित सुचरित, शीलधर्म उत्तमप्रकारे सुरक्षित ठेवून प्रमादरहित ग्रहण करायची प्रतिज्ञा करावी. * वाणी व शरीराची दुष्कर्मे आहेत. त्यामुळे व्यक्ती दुसऱ्याचे सुख हिरावून घेतो, स्वतःच्या दुःखाचे कारण बनतो हे दुर्गुण टाळले पाहिजे म्हणजेच त्रिसरण सहित सुरचित शीलधर्म उत्तमप्रकारे सुरक्षित ठेवून प्रमादरहित ग्रहण करण्याची प्रतिज्ञा करायची. अशाप्रकारे स्वहीत करुण घ्यायचे असल्यास सहा दिशांची पुजा तेच करू शकतात जे नियमावर, ध्यानावर, सावधपणे, जागरूकपणे सतर्क राहून धम्माला श्रद्धापूर्वक धम्मचरण करतात. त्यासाठी 'गरिबी व ताण तणावापासून, संकटातून मुक्त होण्यासाठी चार गुण असतात'. 1) सत्यमार्गी असणे 2) धार्मिकता असणे 3) धैर्यवान असणे 4) त्यागवृत्ती असणे काही संपत्तीनाशाच्या कारणापासून पासून दूर राहतात. पापकर्मे ही 'अकुशल कर्म, 'पक्षपातीपणा, शत्रूत्व, मुर्खपणा आणि भय यामुळे घडतात. त्यामुळे सदगृहस्थानी ध्यान साधनेद्वारा आपले मन नियंत्रित, निर्मळ बनवले पाहिजे. राग, द्वेष, मोह, भय या दूषित मनोचेतनेवर आधारित कसलेही अंकुशल कर्म न करता बुद्धिपूर्वक आपली धनसंपदा कमावून सुरक्षित ठेवावी. त्यासाठी धन नष्ट करण्याच्या सहा कारणांपासून दूर. **मदयपान करणे** - भांडणाची प्रवृत्ती वाढते, संपत्तीची हानी होते. **अवेळी भटकत राहणे** - तो स्वतःची बायको, मुले असुरक्षित राहतात. तमाशा पाहणे, आळस. **कुसंगत** - मित्राची संगत करतांना फुलांसंगे मातीस गंध लागेल या उकतीप्रमाणे पारख करावयास हवी. लोभी मित्र बाहेरून मित्रत्व दाखवतो, परंतू मनातून तो शत्रूसारखा वागतो. **हिरी- सूत्ता** - मध्ये भगवान बुद्धांनी खऱ्या मित्राचे सुंदर वर्णन केले आहे. न सो मित्तो यो सदा अप्पमितो, भेदासंकी रंधमेवानुपस्ती यास्मिच सेती उरसीब पुतो, 'सबे मित्तो यो परे हि अभेज्जो' जो नेहमी मित्र असल्याचे भासवून फूट पाडण्याचा प्रयत्न करतो छिद्रान्वेशन करतो तो मित्र असत नाही. जो आईला कुशीत झोपलेल्या मुलाप्रमाणे विश्वास आणि प्रेम देतो तो दुसऱ्यांद्वारा फुटू शकत नाहीं तो मित्र होय. मधमाशीकडून शिकावे संपत्तीचा / पैशाचा विनियोग कसा करावा, हे समजून घेतले पाहिजे योग्य विनियोग कसा करावा तर आपल्या मिळकतिचा पहिला हिस्सा आपल्या आई - वडिलांवर खर्च करावा. दुसरा हिस्सा - परिवार, पत्नी, मुले याचा उदरनिर्वाह. तिसरा हिस्सा - उद्योग व व्यापार. चौथा हिस्सा - दान /धम्मकार्य अशाप्रकारे संपत्तीचा विनियोग करावा. 'अभिवादेनी नीच्चं नित्त उद्धा- वृद्धा पच्छाताप अभिवादन' याचाच अर्थ अभिवादन करावे असेल ज्यांचे शील आहे, जे नित्य वृद्धांची सेवा करतात त्यांना आयु, वर्ण सुख, बल याचा लाभ होतो. झटपट श्रीमंती येण्यासाठीचे व्यवसायाने पैसा तर येतोच पण मिळविलेला पैसा त्रासच देतो असेल अकुशल कर्म आणि 5 प्रकारचे व्यवसाय कधीच करायचे नाहीत. पशु - पक्षी - प्राण्यांचा व्यवसाय, शस्त्रांचा व्यापार, मांस विक्रीचा व्यापार, मद्याचा व्यापार, विषाचा व्यापार अशा प्रकारच्या व्यवसायाने आपली संपत्ती वाढवू नये. ज्याप्रमाणे मधमाशी फुलांना इजा न करता मध गोळा करते त्याप्रमाणे दुसऱ्यांना दुःख न देता, आनंद सुख देऊ ज्यामुळे कुणाला अंगमेहनत, बुद्धीचा मार्ग आनंद मिळतो व त्या पैशानी उदरनिर्वाह करावा. गृहस्थाने आपले कर्तव्य व्यवस्थित योग्य प्रकारे निभावले पाहिजे. सुख, आनंद आणि प्रशंसा यांच्या अपेक्षापूर्तीसाठी प्रयत्न केले पाहिजेत. जो मानवधर्म आहे तो गृहस्थाला षडदिशांची पुजा याचाच अर्थ - 1) आई - वडील, पालक 'पूर्व दिशा' - आई - वडील जन्म देतात, आपले संगोपन, वाईट मार्गापासुन परावृत्त करतात. मुलांनी आई - वडिलांची, पालक यांची काळजी घ्यावी, त्यांचे पालन - पोषण करावे. ज्या घरात आई वडिलांची पुजा होते. ते घर देवतामय, अतिथियीमय, पूर्वा चार्यमय होते. 2) शिक्षक - 'दक्षिण दिशा' - शिक्षकांची सेवा करावी त्यांचा मानसन्मान करावा. थोडक्यात जेथे आशीर्वाद तेथे आनंद व सुख असते. 3) मुले, पत्नी- 'पश्चिम दिशा' - भगवान बुध्दानी स्त्री - पुरुषांना गृहस्थ




जीवनात समानतेचे सूत्र दिलेले आहे. 4) मित्र, नातेवाईक- 'उत्तर दिशा' - मित्र - नातेवाईक यांच्याशी औदार्याने वागावे, दिलेल्या शब्दाचे पालन करावे. परस्पराच्या भावना दुखावतील, कुटुंबाच्या हिताला जपतात म्हणून एकमेकांना साथ द्यावे. 5) सहकारी, नोकर, चाकर - 'खालची दिशा' - प्रत्येकाने त्यांच्या समर्थ्यानुसार काम, अन्न, पगार, द्यावा. आपले कर्तव्य योग्य प्रकारे करतात आणि मालकाची कीर्ती वाढवितात. 6) धर्मगुरू - 'वरची दिशा' - धर्मगुरू यांची सेवा करावी त्यांच्यासाठी भोजन द्यावे, त्यांच्या ऐहिक गरजा भगवाव्यात कारण ते सन्मार्गाचा उपदेश करतात. भगवान बुद्धानी सिगालला उपदेश केला हे फकत सीगालसाठी नसून प्रत्येकास मार्गदर्शक आहे. शुद्ध धर्माप्रमाणे सार्वजनिक, सार्वदेशिक, सर्वकालिक आहे. तेव्हा सधम्माच्या मार्गावर चालावे. गृहस्थ जीवन आदर्श मंगलमय, कल्याणकारी असे जगावे. ज्यांची बुद्ध धम्म आणि संघावर श्रद्धा आहे असे जे आर्यश्रावक / आर्यश्राविका 'सहा' दिशांची पुजा करतात. तेच 14 नियमांचे पालन करतात आणि उत्कृष्ट जीवन जगतात. ■ ■

करुणा धर्मपाल मून
मो. 9834918301

---

## निर्मिती आणि प्रलय

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

दररोज सकाळी या तिघांना लवकर उठावे लागते. माय, मेहनत आणि मजबूरी. वडिल ही एकमेव व्यक्ती अशी आहे की कुटुंबाच्या जबाबदारीतून कधीही निवृत्त होत नाही. आईला देवाकडे दररोज आपल्या लेकरांसाठी काही ना काही मागावे वाटते. कारण तिला तिच्या लेकरांना सदैव आनंदात बघावे वाटते. मायबाप आपल्या दुःखांची वाच्यता शक्यतो मुलांसमोर करीत नाहीत. त्यांची आर्थिक स्थिती मजबूत नसली तरी मुलांना खुश ठेवण्यासाठी आपली मानसिक स्थिती मजबूत असायला हवी याची ते नेहमी काळजी घेत असतात. काळजातील हुंदके काळजातच जिरवण्याची शक्ती फक्त मायबापात असते. खूप खोल असणारी नदी कोणताही आवाज न करता वाहत असते. तसेच मायबापाच्या मनातील तीव्र वेदना अन् दुःख बिना आसवांच्या असतात. जेव्हा माय आयुष्यातून वजा होते तेव्हा मनापासून आशीर्वाद देणारे कुणीही नसते. बाप निघून गेल्यावर कठीण परिस्थितीत हिम्मत देणाऱ्या पाठीवरील हाताला आपण पोरके झालेले असतो. मायबापासारखा त्याग जगात कुणीही करू शकत नाही. याचा प्रत्यय आपल्याला आयुष्यात तेव्हा येतो, जेव्हा आपण कुणाला काही मागितले तर तो जे देतो, त्याची तो आपल्याला वारंवार जाणीव करून देत असतो. एखाद्यावेळी केलेल्या उपकारासाठी तो वेळोवेळी हटकत राहतो. आपल्याजवळ जे नाही ते समोरच्याच्या जवळ असेल तर तो आपल्याला तुच्छ समजतो. याउलट मायबाप त्यांच्याजवळ जे आहे ते लेकरांना मोठ्या आनंदाने कोणताही गवगवा न करता देऊन टाकतात. आजकाल कोणीही याचा विचार करीत नाही की, तुम्ही त्याचेसाठी काय काय केले. तो नेहमी तुम्ही जे केले नाही त्याचाच विचार करतात. पण मायबाप मात्र लेकराने त्यांचेसाठी केलेल्या लहानातल्या लहान गोष्टींचेही जगासमोर कौतुक करीत असतात. एकदा एका मुलाने त्याच्या वडिलांना विचारले, 'बाबा! तुम्ही या जबाबदाऱ्या कशा काय पार पाडता? तुम्ही एवढे समजदारीने अन् संयमाने कसे काय वागता?' त्यावर त्याचे वडिल म्हणाले, 'बाळा! देशामध्ये राजा, समाजात गुरू, परिवारात पिता आणि घरात आई. हे कधीही सर्वसाधारण नसतात. त्यांना असेच संयम अन् समजदारीने वागावे लागते. कारण त्यांच्याच हातात निर्मिती आणि प्रलय या दोन्हीही गोष्टी असतात'. त्यावेळी त्या पोराच्या मनात विचार आला परमेश्वराने पावलोपावली साथ देणाऱ्या मायबापांनाना आयुष्यभर आपल्यासोबत ठेवण्याची तरतुद का केली नाही? कारण वाईट काळातही ते सावलीसारखी साथसंगत करतात. पण ते जगातून निघून गेल्यावर वाईट परिस्थितीत जगाचा हा अनुभव येतो की, 'बुरे हालात जब घेर लेते है ऐसी मुसीबत की घडी में अपने भी नजरे फेर लेते है।' ■ ■

बहुजन सौरभ

---

# जातीअंत की जाती पुरूज्जीवन ?

**(भाग -2)**

*(चेन्नई, तामीळनाडू येथे 1 मे 22 रोजी संपन्न झालेल्या सामाजिक न्याय परीषदेत निमंत्रित वक्ते प्रा. श्रावण देवरे यांचे भाषण झाले. या इंग्रजी भाषणाचा मराठी अनुवाद लेखस्वरूपात देत आहोत. कार्यक्रमात वेळेचे बंधन असल्याने भाषण संक्षिप्तच करावे लागते. मात्र अनेक हिचिंतकांनी विनंती केली की, हे भाषण लेखस्वरूपात सविस्तर लिहावे. त्यांच्या विनंतीवरून हे भाषण विस्तारीत केले असून आपल्या वाचकांसाठी सादर करीत आहे. - संपादक)*




राम मंदिराचे ब्राम्हणी अस्त्र व मोदी नावाचा ओबीसी मुखवटा या दोन कारणास्तव 2014 साली अखिल भारतीय पेशवाईची ब्राम्हणी प्रतिक्रांती झाली. संघभाजपाचे लुटेरे आजही मोदी नावाचा ''ओबीसी मुखवटा'' लावून अखिल भारतीय ओबीसी वोटबँक लुटत आहेत व आजही सत्तेत येत आहेत. भाजप आणि ओबीसी यांच्यातील नाते राजकीय नाही, सांस्कृतिक आहे. त्यामुळे केवळ भाजपाविरोधी राजकीय भुमिका घेऊन काही उपयोग नाही. जोपर्यंत ओबीसींवर ब्राम्हणवादी संस्कृतीचा प्रभाव आहे. तोपर्यंत ओबीसी आणि भाजपमधील नाते अतूट आहे. जेव्हा हे नाते तुटेल तेव्हा ओबीसी भाजपच्या बंदिवासातून मुक्त होतील आणि ते गैर-भाजप पक्षांकडे येतील आणि हे नाते तोडण्यासाठी तुम्हाला ओबीसींना त्यांच्या स्वतःच्या अ-ब्राम्हणी संस्कृतीची ओळख करून द्यावी लागेल. संघ-भाजपाच्या विरोधात केवळ राजकीय-सामाजिक लढाई करून काहीही उपयोग नाही. सांस्कृतिक संघर्ष केला तरच ओबीसी मतदार काँग्रेसच्या इंडिया आघाडीला सत्तेवर बसवतील.

सामाजिक व राजकिय संघर्ष जेवढ्या लवकर यशस्वी होतात, तेवढ्याच लवकर ते अपयशी होतात. सांस्कृतिक संघर्ष प्रदिर्घ असतो. परंतू तो आपल्या पक्ष-संघटनांना मुळापासून मजबूत बनवतो व सामाजिक-राजकिय लढ्याचा मार्ग सूकर करतो. हे सर्व वास्तव डोळ्यासमोर दिसत असूनही या देशातील डावे, समाजवादी, पुरोगामी-सेक्युलर व फुले-आंबेडकरवादी झोपेचे सोंग घेउन पडलेले आहेत. देशाच्या एकूण मतदारांपैकी 50 टक्केपेक्षा जास्त मतदार ओबीसी जातीतून येतात. देशाच्या सर्वंकष सत्तेच्या तिजोरीची चावी हमखासपणे या ओबीसी वोटबँकेच्या लॉकरमध्ये आहे आणि ही वोटबँक संघ-भाजपाच्या नजर-कैदेत आहे. या ओबीसी वोटबँकची सुटका संघ-भाजपाच्या तावडीतून करायची असेल तर विरोधी पक्षांनाही पर्यायी देशव्यापी आंदोलन उभे करावे लागेल व या आंदोलनाचे विषय असतील, 'जातनिहाय जनगणना', ओबीसी आरक्षण 50 टक्क्यांपेक्षा जास्त करणे, ओबीसी आरक्षणातील तथाकथित क्षत्रिय जातींची (जाट, पटेल, मराठा जातींची) घुसखोरी कायद्याने बंद करणे व ओबीसी-बहुजनांचे 'अब्राम्हणी सांस्कृतिक संघर्षाविषयीचे' प्रबोधन! परंतू असे काहीही न करता केवळ ओबीसींना व त्यांच्या नेत्यांना शिव्या देण्यापलिकडे डाव्या व पुरोगामी विरोधी पक्षांकडे कोणताही कार्यक्रम नाही.

ओबीसींना शिव्या दिल्याने ते अधिकाधिक भाजपाकडे ढकलले जातात, एव्हढे कळण्याइकीही बुद्धी या डाव्या-पुरोगामी नेत्यांकडे शिल्लक राहीलेली नाही. राहूल गांधींनी आतापर्यंत दोन भारत जोडो यात्रा काढल्यात. परंतू देशाचा अर्ध्यापेक्षा जास्त हिस्सा असलेला ओबीसी कुठेच नव्हता. ओबीसी जनगणनेच्या विषयावर ते बोलतात फक्त, मात्र ज्या राज्यात काँग्रेसची सत्ता आहे. तेथे ओबीसी जनगणना होतच नाही. नितिश कुमार आपल्या बिहार राज्यात जातनिहाय जनगणना करू शकतात, मात्र काँग्रेसी मुख्यमंत्री आपल्याच नेत्याचे का ऐकत नसतील? राहुल गांधी उघडपणे जाणवे घालून फिरतात व ब्राम्हणांच्या देवी-देवतांच्या मंदिरात जाऊन पुजा-विधी करतात. या भारत जोडो यात्रेत ओबीसींचे

नॉन-ब्राम्हण संस्कृतीवर प्रबोधन होतच नसेल तर ओबीसी भाजपाला सोडून काँग्रेसकडे कसे येतील? नेहरू-गांधी घराण्याने आजवर ओबीसींवर केलेले अन्याय व ओबीसींचा केलेला विश्वासघात बघता आजच्या ओबीसींनी राहुल गांधींवर व त्यांच्या पक्षावर विश्वास कसा ठेवावा? राहुल गांधींच्या पणजोब्याने (नेहरू) 1955 साली ओबीसींचा कालेलकर आयोग कायमचा बासनात गुंडाळून ठेवला व ओबीसींना त्यांच्या हक्काचे आरक्षण मिळू दिले नाही. राहुलजींच्या आजीने (इंदिरा गांधी) 1981 साली मंडल आयोगाचा अहवाल फेटाळला व ओबीसींना आरक्षणापसून वंचित ठेवले. राहूल गांधींच्या वडिलांनी (राजीव गांधी) 1990 साली मंडल आयोग लागू होत असतांना विरोधी पक्षनेता म्हणून एक तासभर मंडलविरोधात भाषण केले. काँग्रेसचे शेपूट असलेले इंडिया आघाडीतील प्रादेशिक व छोट्या पक्षांची भुमिका काँग्रेसपेक्षा वेगळी नाही. अडवाणींची रामरथ यात्रा संपूर्ण देशभर फिरत होती. देशभर धार्मिक तणाव वाढविणारी व दंगली घडवून आणणारी विध्वंसक रामरथयात्रा देशद्रोहापेक्षा कमी नव्हती. परंतू संपूर्ण देशात असा एकही माई का लाल नव्हता, कि जो या देशद्रोही कृत्याला रोखू शकेल. देशात फक्त एक मात्र लाल होता, आणि तो म्हणजे लालू प्रसाद यादव! बिहारचे तत्कालीन (1990) मुख्यमंत्री असलेल्या लालूजींनी ही विध्वंसक रामरथ यात्रा रोखण्याचे धाडस केले. ते सत्तेत असल्याने पोलीसी बळ वापरून त्यांनी अडवाणींना जेलमध्ये टाकले व रामरथाची मोड-तोड केली. परंतू लालूंकडे फुले-आंबेडकरांचे सांस्कृतिक बळ असते तर त्यांनी अडवाणींची रामरथ यात्रा रोखण्यासाठी पोलीसी बळ वापरण्याऐवजी सिता, शंबूकाचे अस्त्र वापरले असते. सत्तेचा सदुपयोग करीत लालूंनी पूर्ण बिहारमधून सिता, शंबुक, एकलव्य यांच्या प्रतिकांच्या मिरवणूका काढल्या असत्या तर अडवाणींची हिम्मतच झाली नसती रामरथ घेऊन बिहारमध्ये घुसण्याची! अडवाणीचा रामरथ देशभर सर्व राज्यांमध्ये बिनदिक्कत फिरला मात्र तामीळनाडूच्या दिशेने जाण्याची हिम्मत अडवाणी का करू शकले नाहीत? कारण, तामीळनाडूची जनता रावणाला ''हिरो'' मानते व रामाला ''खलनायक''! रामरथाच्या विरोधात सीता, शंबुक, एकलव्य या अब्राम्हणी प्रतिकांच्या मिरवणूका मुख्यमंत्री लालू का काढू शकले नाहीत, कारण लालू फुले-आंबेडकरवादी नव्हते. कांशिरामजी मात्र स्वतःला कट्टर फुले-आंबेडकरवादी मानत होते व त्यांच्या जवळ फुले-आंबेडकरांनी दिलेला सांस्कृतिक अस्त्रांचा भरपूर साठा होता. परंतू, तरीही कांशीरामसाहेब उत्तर भारतात ब्राम्हणी राममंदिराच्या आंदोलनाविरोधात बहुजनांचे प्रति आंदोलन उभे करू शकले नाहीत. हातात हत्यार असूनही शत्रूच्या विरोधात लढाई टाळणे म्हणजे शत्रूला पाठ दाखवून पळ काढणे व भागुबाईसारखी शरणागती पत्करणे होय!

उत्तर भारतात अशा प्रकारचा प्रतिसांस्कृतिक संघर्ष उभा करण्याची ऐतिहासिक जबाबदारी मान्यवर कांशीरामसाहेबांची होती. कारण ते स्वतःला फुले-आंबेडकरवादी म्हणवून घेत होते. भावी काळात जातीअंताची चळवळ मोडीत काढण्यासाठी ब्राम्हणांची युद्ध-छावणी राम-कृष्णाचे सांस्कृतिक अस्त्र वापरू शकते, याची पुरेपूर कल्पना फुले-आंबेडकरांना होतीच! म्हणून या दोन्ही महापुरूषांनी आपल्या अनुयायांच्या भावी पिढ्यांना लढण्यासाठी शस्त्रांचा साठा देऊन गेलेत. राम-कृष्ण या ब्राम्हणी प्रतिकांविरोधात संघर्ष करण्यासाठी फुले-आंबेडकरांनी बळीराजा, रावण, शंबूक, कर्ण, एकलव्य यासारखी महान प्रतिके शस्त्र म्हणून उपलब्ध करून दिलेली आहेत. मान्यवर कांशिरामजी आपल्या पक्षातर्फे उत्तर भारतातून दिल्ली-लखनौमधून शंबूक, एकलव्य, कर्ण, अशा अब्राम्हणी प्रतिकांच्या मिरवणूका काढू शकत होते. ■ ■

**आजचा कळीचा प्रश्न**



प्रा. श्रावण देवरे
मो. 7588072832

---

# तर अमेरिकेतले जैक्सन ओसवाल्ट जग बदलत असतील




जगभरातील शास्त्रज्ञांसाठी हा कौतुकाचा विषय ठरला आणि अर्थातच अमेरिकेच्या सरकारी संस्थांना त्याचे प्रयोग धक्कादायक वाटले. FBI आणि इतर यंत्रणांनी त्याच्या घरावर छापा टाकून तपास केला, पण त्याच्या बुद्धिमत्तेचे कौतुक करत, सुरक्षिततेच्या उपाययोजनांसह पुढील संशोधनासाठी त्याला प्रोत्साहन दिले. जैक्सन हा विज्ञानाच्या मदतीने मानवजातीच्या उज्ज्वल भविष्यासाठी मार्ग शोधत होता. पण भारतात, दुसरीच परिस्थिती दिसते. 10 वर्षीय अभिनव अरोरा नावाचा मुलगा दिवसभर धार्मिक प्रवचने देण्यात व्यस्त असतो.

त्याचा आवाज आणि त्याचे बोलणे पाहून लोक त्याला 'बालगुरु' मानतात. मात्र, खरे पाहता, हा मुलगा त्याच्या आई-वडिलांनी दिलेले रटलेले, पूर्वग्रहदूषित विचार बाहेर पाजळतो. त्याच्या बुद्धीला कोणतीही वैज्ञानिक दिशा मिळत नाही. समाजाचा मोठा गट त्याला 'अवतार' मानतो, त्याच्या प्रवचनांवर चमत्काराच्या कथा रंगवल्या जातात आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे, त्याच्या पालकांसाठी तो पैसे कमावण्याचे साधन बनतो. भारतात अभिनवसारखी अनेक मुर्ख मुले आहेत. ज्यांच्या बालमनावर धार्मिक विचार जबरदस्तीने लादले जातात. त्यांचे विचार हे विज्ञानावर आधारलेले नसून, अनाकलनीय श्रद्धांवर आधारलेले असतात. 'लहान वयात इतके ज्ञान!' अशी स्तुती केली जाते, पण ती मुलांची वैज्ञानिक जिज्ञासा मारून टाकणारी आहे. पालक आपल्या अपत्याला विज्ञानाच्या वाटेवर नेण्याऐवजी, त्याच्या गळ्यात 'भविष्यवाणी' आणि 'धर्मगुरुपणाचा' फास घालतात. अमेरिकेत जैक्सन ओसवाल्टसारखी मुले प्रयोगशाळांमध्ये भविष्य घडवत असताना, भारतात अभिनव अरोरांसारखी मुले धर्माच्या नावाखाली वापरली जात आहेत. देशातील लाखो विद्यार्थी आजही पुरेशा प्रयोगशाळा आणि वैज्ञानिक साधनसंपत्तीच्या अभावामुळे मागे राहतात. पण धार्मिक कट्टरता वाढवण्यासाठी मात्र भरपूर पैसा, प्रसिद्धी आणि माध्यमांचे पाठबळ सहज मिळते. जर भारताला पुढे जायचे असेल, तर प्रत्येक पालकाने आपल्या मुलांचे भविष्य वैज्ञानिक दृष्टिकोनाकडे वळवले पाहिजे. अभिनवला 'बालगुरु' न बनवता, त्याला डॉक्टर, शास्त्रज्ञ किंवा संशोधक होण्यासाठी प्रेरित केले पाहिजे. जैक्सन ओसवाल्टसारखी भारतीय मुलेही असतील, पण त्यांना योग्य संधी आणि प्रोत्साहन मिळत नाही. कारण आपला समाज अजूनही धर्माच्या नावाखाली चमत्कार शोधण्यात अडकलेला आहे. भारताला जर खरोखर महासत्ता बनायचे असेल, तर धर्माच्या नावाखाली लहान मुलांना विकण्याचे प्रकार थांबवावे लागतील. विज्ञान, तंत्रज्ञान आणि नवोपक्रम यावर भर देण्याची हीच योग्य वेळ आहे. नाहीतर, काही वर्षांनी आपण 'बालगुरूंच्या' देशात मागासलेले बसलेले असू, तर अमेरिकेतले जैक्सन ओसवाल्ट जग बदलत असतील. ■ ■

*अमेरिकेतले जैक्सन ओसवाल्ट जग बदलत असतील. अमेरिकेच्या 12 वर्षीय जैक्सन ओसवाल्टने आपल्या घरच्या गॅरेजमध्ये एक संपूर्ण अणुवीज प्रकल्प उभारला. अवघ्या 12 व्या वर्षी न्यूक्लियर फ्यूजन रिक्टर तयार करून त्याने गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये आपले नाव कोरले.*



सागर रामभाऊ तायडे
मो. 9920403859

---

# भविष्यातील संघर्षांचे कारण, पाण्याची टंचाई आणि स्थलांतर

एका दशकापासून दरडोई पाण्याची मागणी 100 ते 120 लिटर दरम्यान होती, जी 2025 पर्यंत 125 लिटरपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. आता पाण्याची मागणी 7900 कोटी लिटरपेक्षा जास्त झाली आहे. राष्ट्रीय जल आयोगाच्या आकडेवारीवरून असे दिसून येते की 1997 मध्ये पाणी उपलब्धता 575 घन क्यूबीक कि.मी. होती, परंतु आता ती सुमारे 500 घन क्यूबीक किमी आहे, तर मागणी सुमारे 800 घन किमी आहे. म्हणजे उपलब्धतेपेक्षा मागणी खूप जास्त आहे. केंद्रीय जल आयोगाच्या अंदाजानुसार, 2025 पर्यंत भूजल पातळी आणखी कमी होऊन 1,434 घनमीटर आणि 2050 पर्यंत 1,219 घनमीटर होईल. पुढील 20 वर्षात 60 टक्के भूजल स्त्रोत धोकादायक स्थितीत असतील या जागतिक बँकेच्या मूल्यांकनात आश्चर्य वाटायला नको. कारण आपल्या पाण्याची 70 टक्के मागणी भूजल स्त्रोतातून भागवली जाते.

साहजिकच मग ना पिकांना पाणी मिळणार ना उद्योगांना. शेती नक्कीच उद्ध्वस्त होईल, देशातील मोठी लोकसंख्या पाण्याच्या प्रत्येक थेंबासाठी तळमळत असेल. अशा परिस्थितीत पाण्याचा अपव्यय थांबवणे गरजेचे आहे. आज जगातील सर्वात मोठे संकट दहशतवाद आणि पर्यावरण प्रदूषण आहे, परंतु 2050 मध्ये जलसंकट हे सर्वात मोठे संकट असेल. भूगर्भशास्त्रज्ञांचा असा विश्वास आहे की जगाची लोकसंख्या 2025 पर्यंत 8 अब्ज आणि 2050 पर्यंत 9 अब्ज होईल. आशिया, आफ्रिका, युरोप इत्यादी देशांमध्ये स्थायिक झालेल्या देशांची मोठी लोकसंख्या. पाणीटंचाईशी झगडत असावेत. या देशांमध्ये काँगो, मोझांबिक, भारत, पाकिस्तान, बांगलादेश, श्रीलंका, नेपाळ, म्यानमार, चीन, कोरिया, घाना, केनिया, नामिबिया, अफगाणिस्तान, अरब अमिराती, इराण, इराक, सीरिया या सर्व देशांचा समावेश असेल. 2050 मध्ये साडेपाच अब्ज लोकांना जलसंकटाचा सामना करावा लागणार आहे. विकसनशील देशांमध्ये ज्याप्रकारे खेड्यांकडून शहरांकडे स्थलांतर होत आहे, त्यावरून असा अंदाज आहे की 2025 च्या अखेरीस जगातील निम्मी लोकसंख्या शहरांमध्ये राहणार आहे, ज्यामुळे जलसंकट आणखी गंभीर होऊ शकते. केंद्रीय भूजल मंडळाच्या नवीन संशोधनानुसार, भारतातील 700 पैकी 256 जिल्ह्यांमध्ये पाण्याची गंभीर समस्या आहे. अतिशोषणामुळे भूजल स्त्रोतांवर दबाव वाढत आहे त्यामुळे विहिरी, तलाव यांसारखे पारंपारिक जलस्रोत कोरडे पडत आहेत. समस्या केवळ पारंपारिक जलस्रोत कोरडे पडण्याची नाही, तर शिल्लक राहिलेले भूजलही प्रदूषित होत आहे. हा प्रश्न एवढा गंभीर आहे की सरकारही ते सोडवू शकत नाही. पिण्यासाठी स्वच्छ पाण्याअभावी जनावरे रोगराईने मरत आहेत, याचा परिणाम देशातील पशुधनावर होत आहे. ज्या भागात तीस-चाळीस वर्षांपूर्वी पाणी वाहायचे आणि सेडमसारखे उपलब्ध असायचे त्या भागातही घरगुती वापरासाठी शुद्ध पाणी उपलब्ध नाही. इंटरनॅशनल हायड्रोलॉजिकल प्रोग्रॅमच्या अंदाजानुसार, ग्लोबल वॉर्मिंगमुळे बाष्पीभवनाचा दर पुढील 10 वर्षांत आजच्या तुलनेत दुप्पट होईल.संयुक्त राष्ट्रांच्या मते, 2030 पर्यंत 70 कोटी लोकांना त्यांच्या भागातून विस्थापित होण्यास भाग पाडले जाऊ शकते. केंद्रीय हवामान खात्याच्या म्हणण्यानुसार, देशभरात एकूण वार्षिक पाऊस 1,170 मिमी आहे आणि तोही केवळ तीन महिन्यात. पावसाचे पाणी वाचवण्याची योजना राबवली तर पाण्याच्या टंचाईपासून तर आपली सुटका होईलच, पण पाण्याशी संबंधित राजकारणातूनही आपली कायमची सुटका होईल. जगभरात सुमारे 2.75 लाख हिमनद्या ओळखल्या गेल्या आहेत, ज्यांचे क्षेत्रफळ सात लाख चौरस किलोमीटरपेक्षा अधिक आहे. हे सर्व क्षेत्र हवामान बदलाच्या दुष्परिणामांमुळे झपाट्याने वितळत आहे.

*नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ हायड्रोलॉजीच्या अभ्यासानुसार, भारतातील विकासाचा वेग वाढल्याने पाण्याचे संकट वाढतच जाईल, अशा इशारा देण्यात आला असून त्यामुळे पाण्यावरून अनेक राज्यांमध्ये संघर्षाची परिस्थिती निर्माण होऊ शकते. साहजिकच गेल्या 40-50 वर्षांत पाण्याचा वापर झपाट्याने वाढला आहे.*




संयुक्त राष्ट्रांच्या अहवालानुसार, हिमालयातील सर्व 19 हिमनदी क्षेत्रांमध्ये सलग तीन वर्षे म्हणजेच 2022, 2023 आणि 2024 मध्ये अभूतपूर्व नुकसान झाले आहे. जागतिक हवामान संघटनेनुसार, नॉर्वे, स्वीडन आणि स्वालबार्ड ही क्षेत्रे सर्वाधिक प्रभावित झाली आहेत. एवढेच नव्हे तर अमेरिकेतील कोलोरॅडो नदी 2020 मध्येच कोरडी पडली आहे. युनेस्कोचे महासंचालक आंद्रे अँगोलेम यांचे म्हणणे आहे की, जगातील 70 टक्के पिण्याचे पाणी हिमनद्यांमध्ये साठवलेले आहे. त्यामुळे हिमनद्यांचे झपाट्याने वितळणे हे पिण्याच्या पाण्याच्या सर्वात मोठ्या स्त्रोताला गंभीर धोक्यात आणणारे आहे. म्हणूनच हिमनद्यांचे संरक्षण करणे ही काळाची सर्वात मोठी गरज आहे. कारण हिमनद्या असतील तर पाणी असेल, पाणी असेल तर जीवन असेल, आणि जीवन असेल तर आपणही असू. नासा आणि नॅशनल स्नो अँड आइस डेटा सेंटरच्या अभ्यासानुसार, 2010 पूर्वी आर्कि टक आणि अंटार्कि टका या भागांतील बर्फाचे आवरण लाखो चौरस किलोमीटरने कमी झाले आहे. सध्या तिथे फक्त 143 लाख चौरस किलोमीटर बर्फउरले आहे, जे 2017 मध्ये नोंदवलेल्या नीचांकी पातळीपेक्षाही कमी आहे. ग्रीनलँड आणि अंटार्किटकातील हिमनद्या 2000 ते 2023 दरम्यान दरवर्षी सरासरी 270 अब्ज टन बर्फ गमावत आहेत. हे प्रमाण 30 वर्षांमध्ये संपूर्ण जगाने वापरलेल्या पाण्याच्या बरोबरीचे आहे. नासाच्या गोडार्ड स्पेस फ्लाइट सेंटरमधील शस्त्रज्ञ लिन बोईसव्हर्ट यांच्या म्हणण्यानुसार, पुढील उन्हाळ्यात आपल्याकडे उरलेला बर्फअत्यंत मर्यादित असेल. या संकटामागे मानवी क्रियाकलापांचा आणि विशेषतः जीवाश्म इंधनांच्या अतिवापरामुळे तापमानात होणाऱ्या वाढीचा मोठा वाटा आहे. 2023 मध्ये भारत सरकारने संसदेत सादर केलेल्या अहवालानुसार, हिमालयातील सुमारे 9,575 हिमनद्या वेगवेगळ्या गतीने वितळत आहेत. भारत, नेपाळ, भूतान, चीन आणि पाकिस्तानमध्ये पसरलेल्या हिमालय पर्वतरांगेतील या हिमनद्या गेल्या तीन दशकांत 20 ते 30 टक्क्यांनी वितळल्या आहेत. मागील 40 वर्षांत हिमालयातून तब्बल 440 अब्ज टन बर्फ वितळले आहे. शास्त्रज्ञांचा अंदाज आहे की हिंदुकुश हिमालयातील 75 टक्के हिमनद्या या शतकाच्या अखेरीस नाहीशा होतील. त्यामुळेच जीवाश्म इंधनांचे युग संपविणे आणि शाश्वत उर्जेच्या दिशेने वाटचाल करणे अत्यावश्यक बनले आहे. ही लढाई केवळ बर्फ वाचविण्याची नाही, तर आपले भविष्य सुरक्षित करण्याची आहे. हिमनद्या केवळ हिमशिखरे नाहीत, तर त्या आपल्या अस्तित्वाचे मूळ आहेत. म्हणूनच आपण आपल्या जीवनशैलीत बदल घडवायला हवा, हिमालयीन परिसरातील मानवी हस्तक्षेप नियंत्रित करायला हवा आणि हवामान बदल व कार्बन उत्सर्जनावर प्रभावी नियंत्रण मिळवले पाहिजे. त्याशिवाय या संकटावर मात करणे अशक्य आहे. तात्पर्य, जलसंधारण आणि पाण्याचा योग्य उत्तम वापर करून देशाला जलसंकटापासून वाचवता येईल. ज्या भागात पावसाचे प्रमाण अत्यल्प आहे, भूजल हाच एकमेव स्त्रोत आहे, तेथे पाणीटंचाईवर मात कशी करता येईल, याचा विचार करण्याची गरज आहे. अशा परिस्थितीत पावसाच्या पाण्याचे संवर्धन करूनच या संकटावर मात करता येऊ शकते, परंतु बहुराष्ट्रीय कंपन्यांकडून पाण्याची मनमानी पिळवणूक थांबवणेही अत्यंत गरजेचे आहे. वाढत्या पाणीटंचाईकडे सर्वसामान्य जनता आणि सरकारची बेफिकीर वृत्ती हा चिंतेचा विषय आहे. भविष्यात याचे गंभीर परिणाम होऊ शकतात. ■ ■

विकास परसराम मेश्राम
मो. 7875592800

# सूर्य प्रभामंडल ही एक नैसर्गिक आणि आकर्षक घटना

**संवाद मित्र डॉ. सुनिल भगत, नागपूर :** आज दिनांक 21 मे 2025 ला अंदाजे दुपारी 12 वाजता आकाशात सूर्याच्या भोवती वर्तुळाकार तेजोमंडल दिसत होते. त्याला सूर्य प्रभामंडल असे म्हणतात. ज्याला इंग्रजीमध्ये 'सॅन हॅलो' असेही म्हणतात, ही एक अतिशय प्रेक्षणीय, खगोलीय, नैसर्गिक प्रकाशीय (optical) घटना आहे. हे सूर्याभोवतीचे दृश्य बघतांना डोळ्याचे पारणे फिटले. ही घटना सूर्य किंवा चंद्राच्या भोवती एक प्रकाशवृत्त किंवा हॅलो (halo) तयार करते. या हॅलोमध्ये अनेकदा रंग देखील दिसतात.



सूर्य प्रभामंडलाचे स्वरूप : प्रकाशवृत्त : सूर्याभोवती एक गोलाईदार, उजळ प्रकाशवृत्त दिसते.

रंग : या प्रकाशवृत्तमध्ये अनेकदा अनेक रंग दिसतात, जसे लाल, केशरी, पिवळा, हिरवा, निळा आणि जांभळा. हे रंग बर्फाच्या स्फटिकांमुळे (ice crystals) सूर्यप्रकाशाचे अपवर्तन (refraction) झाल्याने दिसतात.

कळ : सूर्य प्रभामंडल अनेकदा 22 अंशाच्या कोनात दिसतो, पण काहीवेळा तो 45 अंशाच्या किंवा इतर कोनातही दिसू शकतो.

सूर्य प्रभामंडल कशाप्रकारे तयार होतो?

बर्फाचे स्फटिक : वातावरणात उच्च उंचीवर, जिथे तापमान 0 अंश सेल्सियसपेक्षा कमी असते, तिथे बर्फाचे स्फटिक तयार होतात.

सूर्यप्रकाश : जेव्हा सूर्यप्रकाश या स्फटिकांवर पडतो, तेव्हा प्रकाश अपवर्तित होतो आणि परावर्तित होतो.

प्रकाशवृत्त : या अपवर्तन(refraction) आणि परावर्तनामुळे सूर्य किंवा चंद्राच्या भोवती एक प्रकाशवृत्त (हॅलो) तयार होते.

सूर्य प्रभामंडल आणि हवामान :-

पातळढग : सूर्य प्रभामंडल अनेकदा पातळ किंवा पातळ ढगांच्या थरात दिसत असतो, जसे की सिरस (cirrus) किंवा सिरोस्ट्रॅटस (cirrostratus) ढग हे पातळसर ढग असतात.

वादळ : काहीवेळा, सूर्य प्रभामंडल वादळाच्या आधी दिसू शकते, कारण ढगांच्या थरात जास्त बर्फाचे स्फटिक असतात.

सूर्य प्रभामंडल आणि संस्कृती :-

कला :- सूर्य प्रभामंडलाचे वर्णन अनेक कलाकृतींमध्ये आणि साहित्यात आढळते.

निष्कर्ष :- सूर्य प्रभामंडल ही एक नैसर्गिक आणि आकर्षक घटना आहे, जी वातावरणातील बर्फाच्या स्फटिकांमुळे तयार होते.

सूर्याचे प्रभामंडल पाहणे धोकादायक नाही, परंतु थेट सूर्याकडे पाहणे अजूनही हानिकारक आहे. सूर्याचे प्रभामंडल एका चमकदार, पांढऱ्या रिंगसारखे दिसू शकते, परंतु कधीकधी ते इंद्रधनुष्यासारखे रंग दाखवते.

## स्वयंरोजगार व उद्योजकता हा युवक सशक्तीकरणाचा मार्ग : पंकज यादव





**नागपूर :** ग्रामीण विकास मंत्रालयाचे सहसचिव पंकज यादव (आयएएस) यांनी महाबँक ग्रामीण स्वयंरोजगार प्रशिक्षण संस्था (RSETI), नागपूर येथे सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी त्यांनी युवक सशक्ती करणासाठी स्वयंरोजगार व उद्योजकतेचे महत्त्व अधोरेखित केले, विशेषतः महिलांच्या सक्षमीकरणाच्या दृष्टीने पंकज यादव यांचे स्वागत राहुल वाघमारे, विभागीय व्यवस्थापक, बँक ऑफ महाराष्ट्र (नागपूर विभाग) अतुल परडिकर, उपविभागीय व्यवस्थापक तुषार माळी, प्रकल्प संचालक, DDU-GKY; व व्ही. बी. डहीकर, संचालक, महाबँक RSETI, नागपूर यांनी केले. यावेळी 'इलेक्टिव्ह - महिला वस्त्र शिवणकाम' या 31 दिवसांच्या प्रशिक्षण क्रमातील प्रशिक्षणार्थींशी संवाद साधताना यादव यांनी जीवनातील आव्हाने स्वीकारण्याचे व आत्मनिर्भरतेच्या दिशेने पाऊल उचलण्याचे आवाहन केले. 'स्वयंरोजगार आणि उद्योजकता केवळ स्वतःसाठीच नव्हे, तर इतर गरजू युवकांसाठी रोजगारनिर्मितीचे साधन बनू शकतात,' असे ते म्हणाले. राहुल वाघमारे यांनी भारताच्या युवकांचे राष्ट्रनिर्माणातील योगदान लक्षात घेऊन, शिक्षण आणि स्वयंरोजगाराच्या माध्यमातून महिलांना सक्षम करण्यावर भर दिला. त्यांनी मान्यवरांचे मार्गदर्शन आणि उपस्थितीसाठी आभारही मानले. महाबँक RSETI नागपूरचे संचालक व्ही. बी. डहीकर यांनी संस्थेच्या कार्यपद्धती व उद्योजकता विकास कार्यक्रमाची माहिती दिली. त्यांनी प्रशिक्षणार्थींना केवळ नोकरीच्या शोधात न राहता उद्योजक बनण्याची प्रेरणा दिली. या कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चंदू नागपुरे, टिनोपल गेडाम, निशिकांत गाले, कृणाल ढोणे आणि मंगेश वर्पल्लिवार यांनी विशेष मेहनत घेतली.





## समता बुद्ध विहार, स्वतंत्र नगर

नंदनवन परिसर पूर्व नागपूर, विहारात विविध प्रकारचे कार्यक्रम होतात. बुद्ध रूप, आईसाहेब रमाई यांचा पुतळा असून परिसरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पुतळा आहे. विहारात अंगणवाडी असून अनेक महापुरुषांच्या जीवनावर फोटो सह माहिती आहे. अध्यक्ष - सुमिता सुखदेवे, उपाध्यक्ष - पौर्णिमा शेंडे, सचिव - भूमीका नारनवरे, कोषाध्यक्ष आशा मेश्राम आणि 21 लोकांची कार्यकारी मंडळ आहे.

संवाद मित्र, राजकुमार वंजारी
9422550041

## महत्वाचे

### आझाद समाज पार्टीची विभाग संघटना बांधणी मोहिमेला उत्स्फूर्त प्रतिसाद



**नागपूर :** आझाद समाज पार्टी (कांशीराम) नागपूर जिल्हा दक्षिण, दक्षिण पश्चिम विधानसभेच्या सेक्टर बांधणी मोहिमेत नागसेन बडगे उपाध्यक्ष, नागपूर जिल्हा आसपा प्रयत्नातून किरण पाटील, बबलू गावंडे, नरेश ढोले, सोनाली गजभिये, वृषभ पानतावणे, विशाखा गजभिये, रंजीता बडगे, निमा मेश्राम, आकाश पाटील, विकी वानखेडे, सविता नाईक, सूरज पाटील, आशाबाई गजभिये, रंजना शंभरकर अशा अनेक कार्यकर्त्यांनी रुपेश बागेश्वर प्रभारी महाराष्ट्र राज्य, जे. बी. रामटेके प्रदेश सरचिटणीस, नितीन नागदेवे विदर्भ पूर्व झोन अध्यक्ष, उपाध्यक्ष अशोक वाघमारे, संदीप मेश्राम अध्यक्ष नागपूर जिल्हा, नागसेन बडगे उपाध्यक्ष नागपूर जिल्हा, मुस्लिम भाईचारा उपाध्यक्ष सलमान पठाण, भूषण सोमकुवर जिल्हा महासचिव यांच्या उपस्थितीत आझाद समाज पक्षात (कांशीराम) प्रवेश केला.

### भारतीय सद्धम्म बुद्ध विहारात आजपासून दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिर

**नागपूर :** स्थानिक लष्करीबाग येथील भारतीय सद्धम्म बुद्ध विहार येथे दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिर सुरू होत आहे. दुपारी चार वाजता भदंत नागवंश यांच्या हस्ते श्रामणेर दीक्षाविधी संपन्न होईल. यानंतर सहा वाजता डॉ. अजय भालाधरे, डॉ. अंजली भालाधरे यांच्या हस्ते शिबिराचे उद्घाटन होईल. भदंत नागवंश हे श्रामणेरांना प्रशिक्षण तथा बौद्ध तत्त्वज्ञानातील विविध विषयावर खडू फळा प्रवचनाद्वारे धम्म शिकवतील. शनिवार दि. 31 मे रोजी दुपारी एक वाजता भिक्षु संघाच्या उपस्थितीत या दहा दिवसीय श्रामणेर प्रशिक्षण शिबिराचा समारोप होईल. शिबिरार्थींनी 22 मे रोजी दुपारी दोन वाजेपर्यंत केशवपण करूनच यावे. सोबत वही, पेन इत्यादी आवश्यक साहित्य घेऊन यावे. या शिबिराच तमाम बौद्ध जनतेने लाभ घेण्याचे आवाहन विहाराचे अध्यक्ष डीएम बेलेकर, उपाध्यक्ष धर्मदास मेश्राम आणि सचिव राजकुमार मेश्राम यांनी केले आहे.

### दहशदवाद व हिंसाचार विरोधी दिनानिमित्त महावितरणमध्ये प्रतिज्ञा



**नागपूर :** दहशतवाद व हिंसाचार दिनाच्या निमित्ताने महावितरणच्या नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांनी काटोल मार्गावरील विद्युत भवन येथे आयोजित कार्यक्रमात उपस्थितांना प्रतिज्ञा दिली. यावेळी अधिक्षक अभियंता मंगेश वैद्य, संजय वाकडे, उपमुख्य जनसंपर्क अधिकारी योगेश विटनकर यांच्यासह महावितरण व महानिर्मितीचे अधिकारी, अभियंते व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णूतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तिनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, मानवी जिवीत मूल्ये धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तींचा प्रतिकार करु, अशी प्रतिज्ञा यावेळी उपस्थित सर्वांनी घेतली.

## माणूस केंद्र बिंदू मानून डॉ. बाबासाहेबांनी राष्ट्र उभारणी केली : प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर

**बार्शी :** डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी अनेक चळवळी केल्या, आंदोलने केली, लढे उभारले, लेखन केले, वक्तव्य केली. त्यावेळी त्यांच्यासमोर राष्ट्राचे सार्वभौमत्व होते. भारताच्या ऐक्याला तडा जाईल असा एकही निर्णय किंवा कार्य त्यांच्यातून झाले नाही. या सर्वांमध्ये माणूस हा केंद्रबिंदू होता. माणसाला केंद्रबिंदू मानून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राष्ट्र उभारणी केली असे विचार प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर यांनी व्यक्त केले.





प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टने आयोजित केलेल्या महात्मा बुद्ध, महात्मा बसवेश्वर, छत्रपती संभाजी महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या संयुक्त जयंतीच्या निमित्ताने आयोजित केलेल्या व्याख्यानात, 'डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे राष्ट्र उभारणीतील योगदान' या विषयावर छत्रपती संभाजीनगर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील सेवानिवृत्त मराठी विभाग प्रमुख प्रा. डॉ. प्रल्हाद लुलेकर बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवाजी महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य डॉ. चंद्रकांत मोरे हे होते. 1918 साली डॉ. बाबासाहेब आंबेडकर शेतीच्या समस्या आणि त्यावरील उपाय सांगतात. कोकणातील चिपळूण येथील परिषदेमध्ये डॉ. बाबासाहेब म्हणतात की, मला शेतकऱ्यांतील प्रधानमंत्री झालेला पाहायचा आहे. पण देशाच्या आजपर्यंतच्या इतिहासात शेतकऱ्यांचा मुलगा प्रधानमंत्री झाल्याचे दिसून येत नाही अशी खंत त्यांनी व्यक्त केली. शेतकऱ्यांचा पहिला संप कोकणामध्ये डॉ. बाबासाहेबांच्या नेतृत्वाखाली अलिबाग जवळील चरी या ठिकाणी झाला होता. तसेच डॉ. बाबासाहेबांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांचा किती सखोल अभ्यास केला होता याचा आढावा त्यांनी आपल्या भाषणात घेतला.

प्रा. अशोक वाघमारे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष विष्णू कांबळे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. जे. पी. गायकवाड यांनी संचालन केले तर भीमराव कदम यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रमासाठी प्रा. कॉ. तानाजी ठोंबरे, पा.न. निपाणीकर, प्रा. ए. बी. विद्यागर, प्राचार्य डॉ. गोरे, तसेच मातोश्री रामाई महिला मंडळाच्या सर्व सदस्या, ज्येष्ठ नागरिक, महिला, तरुण मोठ्या प्रमाणात हजर होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रबुद्ध भारत चॅरिटेबल ट्रस्टचे प्रा. डॉ. शशिकांत गायकवाड, प्रा. डी. डी. मस्के, सुनील कांबळे, विक्रम सुरवसे तसेच महादेव बोकेफोडे यांनी नियोजनात महत्त्वाची भूमिका बजावली, नागनाथ सोनवणे व समविचारी फ्रंटच्या अनेक कार्यकर्त्यांनी सहकार्य केले.

## नॉर्थ नागपूर सिनीयर सिटिझन फोरम तर्फे जेष्ठ नागरिकांचा सत्कार

**नागपूर :** नॉर्थ नागपूर सिनिअर सिटिझन फोरमच्या इंदोरा येथील कार्यालयात सन्माननीय फोरमच्या सदस्यांचे जन्मदिवस झालेत, त्यांच्या सन्मानार्थ, छोटेखानी सत्कार कार्यक्रम घेण्यात आला. सत्कार मूर्तीनीं आपली उपस्थिती देऊन कार्यक्रमास उत्कृष्ट प्रतिसाद दिला आणि सत्कारमूर्तींना संविधान उद्देशिकाचे सन्मानचिन्ह व सम्यक वार्षिकांक देवून सन्मान करण्यात आले. तसेच बहुजन सौरभ वृत्तपत्राची प्रती देवून बहुजन सौरभचे सभासदत्व स्विकारण्याची विनंती केली. संयुक्तिक जन्मदिनाचा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.





सिद्धार्थ गेडाम, रमेश ठवरे, राजकुमार राऊत, श्रीधर मंडपे, रमेश गायकवाड, सिध्दार्थ रंगारी हे सर्व सदस्य उपस्थित होते. संयुक्तिक जन्मदिन कार्यक्रम फार छान वातावरणात पार पडला.

कायक्रमाचे संचालन अश्विन बोरकर यांनी केले. त्यांनी नॉर्थ नागपूर सिनिअर सिटिझन फोरमच्या उत्तर नागपुरातील, प्रशासनाशी चर्चा करून निवेदने देऊन झालेल्या विकासाच्या कार्याबद्दल माहिती दिली. नरेश साखरे यांनी फोरमच्या कार्यप्रणालीची माहिती देऊन संघटित राहून, उत्तर नागपुरातील विकासा संबंधी कार्य, वेगवेगळ्या वस्त्यांमधील लोकांच्या समस्या, फोरम तर्फे कश्या सोडवल्या जातात याची माहिती दिली.

फोरमने, म्हाडा कॉलोनी आणि समता नगर येथील समस्यांचे प्रश्न नागपूर महानगरपालिकेला निवेदन देऊन, आयुक्तांशी चर्चा केल्यामुळे, उपस्थित केलेल्या प्रश्नांना लक्षात घेऊन आणि त्यावर कारवाई करून नागपूर महानगरपालिकेने दिलेल्या पत्राचा उल्लेख केला. ज्यात नमूद करण्यात आले की म्हाडा कॉलनीतील समस्यांचे निराकरण करण्यात आले आहे आणि समता नगर येथील कार्य प्रगतीपथावर आहे. ही फोरमची कार्यप्रणाली उपलब्धीच आहे. संयुक्तिक जन्मदिन सत्कारमूर्तीनी आपले मनोगत व्यक्त केले आणि फोरमच्या कार्यात, जे की समाजपयोगी कार्य केले आहे त्यात वेळोवेळी, जसे शक्य होईल आपला सहभाग देण्यास मनापासून तयारी आभार श्याम सनकाळे मानले.

नरेश उके, विवेक निमगडे, मोतीलाल नाईक, ॲड. मंडपे यांनी सहकार्य केले.

## टेकाप्स गार्डन वसाहतमध्ये बुद्ध जयंती साजरी





**नागपूर :** त्रिगुणी पौर्णिमेच्या पावन दिवसाच्या निमित्ताने म्हणजे बौद्ध पौर्णिमेचे औचित्य साधून, टेकाप्स गार्डन, वसाहतमध्ये बुद्ध पौर्णिमा, दरवर्षीप्रमाणे यावर्षी सुद्धा साजरी करण्यात आली. सकाळी आठ वाजता कार्यक्रमाची सुरुवात, महापुरुषांना माल्यार्पण आणि दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली.

या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून सन्माननीय जनार्दन सोमकुवर हे उपस्थित होते. तसेच प्रमुख पाहुणे म्हणून प्रिती तिरपुडे, संध्या घोडके, कुंदा पाटील या उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रिती तिरपुडे यांनी आपल्या मार्गदर्शनात अतिशय महत्त्वाची माहिती दिली. कार्यक्रमाचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकर विचार मंच तसेच रमाई महिला मंडळ, संपूर्ण कमिटी मेंबर्स, विचार मंच अध्यक्ष विनोद बाराहाते, सचिव चंद्रशेखर घोडके, कोषाध्यक्ष अविनाश गोसावी, विजय नंदागवळी, अध्यक्ष रमाई महिला मंडळ भाविका गोसावी, कोषाध्यक्ष मंगला लाडे आणि टेकाप्स गार्डन, सिटी येथील बुद्धिस्ट परिवारातील संपूर्ण उपासक आणि उपासिका यांनी केले असून, संचालन सचिव रमाई महिला मंडळ, मानसी कुचेकर यांनी केले असून, आभार ज्योत्स्ना बनसोड यांनी केले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी संपूर्ण टेकॉप्स सिटी, गार्डन परिसरातील बुद्धिस्ट परिवारांनी तसेच रमाई मंडळ आणि विचार मंच यांनी प्रयत्न केले.



## अपंग जान्हवीने नाकारला दैवी चमत्कार

**नागपूर :** टिमकी येथील रा. बा. कुंभारे सभागृहातील पहिल्या व दुसऱ्या माळ्यावर शिबीराच्या तिसऱ्या दिवशी आदिम संशोधन-अध्ययन मंडळ व अस्तित्व क्रियेशन आणि एज्युकेशन एम्पायरमेंट ऑफ अंडरप्रिवीलेज्ड गर्ल्स फाऊंडेशन, नागपूर यांच्या संयुक्त उपक्रमातून महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष तथा नशाबंदी मंडळाचे जिल्हा संघटक गौरव आळणे यांनी 'अंधश्रद्धेची दुनिया.. विज्ञानाची किमया' हा अंधश्रद्धेवरील प्रात्यक्षिकांसह विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. विशेष म्हणजे अपंग विद्यार्थिनी जान्हवीने स्वतःच्या हातावर कापूर जाळून दैवी चमत्कार नाकारला. यावेळी अचूक उत्तरे देणाऱ्या विद्यार्थ्यांना नशाबंदी मंडळाची महामानवांचे व्यसनमुक्तीपर विचार पुस्तके भेट देऊन व्यसनमुक्तीचा संदेश दिला.

तर दुसऱ्या शिबिरात जोडीदाराची विवेकी निवड विभाग प्रमुख डॉ. कविता मते यांनी मानसिक छळ व अत्याचारा संबंधात मुलींनी सावध राहणे अनिवार्य असल्याचे सांगीतले. या प्रसंगी विशेष अतिथी ओ.एन.जी.सी. मुंबईचे सेवानिवृत्त अधिकारी सुभाष सोनकुसरे यांनी दोन्ही शिबीराला मार्गदर्शन केले. तसेच शालेय साहित्याच्या मदतीसाठी रूपये 10,000/रू. चा धनादेश आयोजक प्रकाश निमजे यांचेकडे सुपूर्द केला. यावेळी विष्णू भनारकर, प्रदीप पवनीकर व इतर सहकाऱ्यांनी यशस्वीतेसाठी प्रयत्न घेतले.

## दिव्यांग वडिलाच्या होतकरू विद्यार्थ्याच्या शिक्षणासाठी मदतीची गरज!

**अकोला :** 'माझे स्वप्न आहे शिक्षण घेऊन मोठे होण्याचे...पण बाबा, तुम्ही मजुरी करून ती फी कशी भरणार?' असे भावनिक म्हणणे आहे अकोल्यातील एका हुशार, होतकरू आणि अत्यंत गरजू विद्याथ्र्याचे. श्री केशव कड, नोवेल स्कूल, अकोला येथून नववी उत्तीर्ण झालेला हा मुलगा आज केवळ पैशा अभावी दहावीला प्रवेश मिळवू शकलेला नाही. श्री च्या शिक्षणाच्या मार्गात अडथळा ठरत आहे रु. 20,000/- इतकी थकीत शैक्षणिक फी व पुढील दहावीची फी जी त्याच्या कुटुंबाची परिस्थिती लक्षात घेता भरली जाणे अशक्यप्राय झाले आहे. श्री चे वडील शारीरिकदृष्ट्या दिव्यांग असून, अत्यंत हलाखीच्या परिस्थितीत मजुरी करून कसेबसे उदरनिर्वाह करतात. सध्या कुटुंब सूर्य विंग अपार्टमेंट, खडकी, अकोला येथे वास्तव्यास आहे. या कठीण परिस्थितीतही श्री ने हार न मानता नववी उत्तीर्ण केली आणि त्याला दहावीचे शिक्षण पूर्ण करून उज्ज्वल भवितव्य घडवायचे आहे. या पार्श्वभूमीवर, समाजसेवक गजानन हरणे यांनी समाजातील दानशूर नागरिकांना, सेवाभावी संस्थांना, शाळा व्यवस्थापनाला आणि प्रशासनाला भावनिक आवाहन केले आहे, की, 'हा मुलगा पुढे जाऊन समाजासाठी दीपस्तंभ ठरू शकतो, पण आज त्याला शिक्षणासाठी तुमच्या मदतीची गरज आहे. चला, आपण मिळून या स्वप्नांचे पंख तुटू देऊ नका.'

श्री सारख्या गरजू विद्यार्थ्यांना मदत करणे हे आपल्या सामाजिक जबाबदारीचे भाग आहे. मदतीसाठी खालील माहितीचा आधार घ्यावा - श्री केशव कड (विद्यार्थी) संपर्क - 7522919169 पत्ता - सूर्य विंग अपार्टमेंट, खडकी, अकोला

बँक तपशील -

Account Number : 40078918035

IFSC Code: SBIN 0012015

बँक - स्टेट बँक ऑफ इंडिया दानशूर व्यक्तींनी व संस्थांनी या खात्यावर थेट मदतीची रक्कम जमा करून किंवा संपर्क साधून या होतकरू विद्यार्थ्याच्या शिक्षणाचा मार्ग मोकळा करावा, असे आवाहन समाजसेवक गजानन हरणे यांनी केले आहे. 'एक विद्यार्थी घडवणे म्हणजे एक समाज घडवणे आहे.' हे लक्षात ठेवून कृती करावी, हीच अपेक्षा.गजानन हरणे मो.98229 42623, समाजसेवक अकोला.

## सिटूच्या आशा वर्कर व गटप्रवर्तक यांनी केले संविधान चौकात धरणे आंदोलन

### मुख्यमंत्री व महसूल मंत्री यांनी घेतलेल्या सकारात्मक भूमिकेमुळे संप स्थगती

**नागपूर :** आशा व गटप्रवर्तक कर्मचारी युनियन व आरोग्य विभाग कंत्राटी कर्मचारी युनियन (सीआयटीयू) नागपूर जिल्हा तर्फे नागपूरच्या संविधान चौकात बारासे आशा वर्कर व गटप्रवर्तक यांनी उपस्थित राहून कॉ. राजेंद्र साठे यांचे नेतृत्वात धरणे आंदोलन केले. आंदोलन कर्त्यांना मार्गदर्शन करताना कॉ. राजेंद्र साठे यांनी सांगितले कि, शासनाने पंधरा दिवसात तोडगा न काढल्यास बेमुदत संप करावाच लागेल. त्याकरता सर्व आशा वर्कर व गटप्रवर्तक यांनी तयारी करावी असे सांगितले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पहलगाम येथे मृत्यूमुखी पडलेले नागरिक व सिंदूर अभियानाद्वारे मृत्यूमुखी पडलेले सैनिक यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. देशात सध्या सुरू असलेल्या तणावाच्या वातावरणामुळे आज होणाऱ्या देशव्यापी संपाला सर्व केंद्रीय संघटनांनी स्थगिती देऊन 9 जुलै रोजी देशव्यापी संपाची घोषणा करत 9 जुलै रोजी खंडोबा देवस्थान ते जिल्हाधिकारी कार्यालयपर्यंत सीआयटीयू तर्फे आशा वर्कर व गटप्रवर्तक यांचा विशाल मोर्चा काढण्यात येणार अशी त्यांनी घोषणा केली. राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत काम करणाऱ्या आशा वर्कर व गटप्रवर्तक व कंत्राटी कर्मचारी यांना केंद्र शासनाच्या योजनेनुसार काही मोबदला व राज्य शासनातर्फे काही मोबदला देण्यात येतो. राज्य शासनाचा मोबदला आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना फेब्रुवारी महिन्यापर्यंत मिळाला असून डिसेंबर महिन्यापासूनचा केंद्र शासनाचा निधी केंद्र शासनाने राज्याला व राज्याने जिल्ह्याला पाठवण्यात न आल्यामुळे तो निधी आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना मिळू शकलेला नाही. सध्या असलेले तापते वातावरण व विविध प्रकारचे सर्वे व विविध कामाचा बोजा त्यामुळे आशा वर्कर व गटप्रवर्तक कंटाळले असून त्यामध्ये डिसेंबर महिन्यापासून मानधन न मिळाल्यामुळे त्यांच्या त्रासामध्ये अधिक भर पडलेली आहे. त्यामुळे आशा वर्कर व गटप्रवर्तक यांना संकटातून बाहेर काढण्याकरिता मंत्रालया मार्फत विशेष निधीचे प्रावधान करून योग्य मार्ग काढावे अशी भूमिका मांडण्यात आली.



कार्य बजावत असणाऱ्या आशा वर्कर किंवा गटप्रवर्तक यांचा अचानकपणे कोणत्याही कारणाने मृत्यू झाल्यास त्यांच्या नाबालिक असणाऱ्या मुलगा किंवा मुलगी यांना शिक्षण व उपजिविका चालवण्यासाठी 50 लाख रुपये सानुग्रह मदत करावी. आंदोलनाचे नेतृत्व कॉ. राजेंद्र साठे, प्रिती मेश्राम, रंजना पौनिकर, लक्ष्मी कोत्तेजवार, माया कावळे, सरला मस्के, सारिका लांजेवार, मोनिका गेडाम, उज्वला कांबळे, संगीता मेश्राम, सोनम सोनवणे, सुवर्णा गोखे, अर्चना निर्मळे, नलू गजभिये, प्रतिमा डोंगरे, सरिता ठवरे, अर्चना ठाकरे, अर्चना कोल्हे, नीता भंडारकर, सपना गणवीर, विजेता नितनवरे, शिल्पा हाडके, गीता विश्वकर्मा, मयुरी सुखदेवे, आरती चांभारे, अर्चना निर्मळे, निकिता सहारे, कीर्ती गजभीये, कनिजा शेख, मनीषा मुलमुले, विशाखा चौधरी, शिवानी हातोडे, अस्मिता मानवतकर, मंगला बागडे, वंदना बहादुरे, रोशनी कांबळे, वनिता कुबडे, अंजू चोपडे, सुलताना खान, संध्या बाथो, संध्या सोनबावणे, उज्वला सातपुते, गीता मेश्राम, ज्योत्स्ना चिंचाळकर, जीवनकला ढोके, ज्योती ढोके, भाग्यश्री गायके, अर्चना ठाकरे, विशाखा पाटील, सपना घरडे, वैशाली बावनकुळे सह इतर आशा वर्कर व गटप्रवर्तक यांनी केले.

## संत-महापुरुषाचे विचार डोक्यात घ्या डोक्यावर नाही : ज्ञानेश्वर रक्षक



**नागपूर :** शिवा संघटनेचे उपाध्यक्ष अभय कल्लावार यांनी वाडी, नागपूर येथे महात्मा बसवेश्वरांच्या जयंती कार्यक्रमात राष्ट्रसंत तुकडोजी विचार साहित्याचे अभ्यासक ज्ञानेश्वर रक्षक यांना प्रमुख वक्ता म्हणून निमंत्रीत केले. त्यांनी आपल्या वक्तव्यातून विचार मांडले की, महात्मा बसवेश्वरांनी 12 व्या शतकात अस्पृश्य निवारण्यासाठी मिश्र विवाह ब्राम्हण पुत्र आणि अस्पृश्य मुलीशी लावून तत्कालीन समाजव्यवस्थेला चपराक हाणली. आजही 21 व्या शतकात जातीव्यवस्थेचे चटके समाज जीवनात आम्ही सोसतो आहोत. भगवान बुद्धापासून चाललेला परिवर्तनाचा लढा शिक्षणाने सुधारला नाही. श्रद्धा आमच्या सहज अंधश्रद्धेत बदलत, संत-महापुरूष प्रतिमा रूपाने पुजेत आम्ही बसवतो देवत्व बहाल करीत. त्यांचे विचार लाल फडक्यात बांधून फुले वाहतो. यावर चिंतन मांडले. संत महापुरूषांचे विचार डोक्यात घ्या डोक्यावर नाही. याप्रसंगी शिवा अखिल भारतीय विर शैव संघटनेचे कार्यकर्ते मोठ्या प्रमाणात उपस्थित होते. जयंती कार्यक्रमाचे अध्यक्ष अभय कल्लावार यांनी संघटनशक्तीचे महत्व सांगत महात्मा बसवेश्वरांनी संगीतलेले मानवी मूल्याची विश्वाला गरज आहे. हे विचार तरूण पिढीपर्यंत पोहचवणे ही काळाची गरज आहे. असे प्रतिपादन केले.


## स्टुडिओ किरायाने देणे आहे



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451


बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. RNI No. MAHMAR 2020/84035 Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648